फेब्रुवारी २०२५

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा...
रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी,
चारी वर्णातुनी फिरे
सरस्वतीची पालखी...

कवी : कुसुमाग्रज



# मऱ्हाटी भाषासुंदरी

जैसी दीपांमाझि दिवटी । कां तिर्थीमाझि पूर्णिमा गोमटी ।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी । सर्वोत्तम ।।१।।

जैसी सरितांमध्ये गोदावरी । कां पर्वतांमध्ये रत्नागिरी ।
तैसी भाषांध्ये साजरी । मऱ्हाटी पैं. ।।२।।

हरळांमध्ये रत्नकिळा । पुष्पांमध्ये कमळ ।
तैसी भाषा सोज्वळ । शोभिवंत दिसे ।।३।।

दुर्गावरि शोभे चरी । कां मुक्ताफळे शोभती हारी ।
तैसी शोभे भाषांमाझारी मऱ्हाटी पैं ।।४।।

तीर्थांमध्ये काशी । व्रतांमध्ये एकादशी ।।
भाषांमध्ये तैशी । मऱ्हाटी शोभिवंत ।।५।।

परिमळांमध्ये कस्तुरी । कां अंबरामध्ये शंबरारी ।
तैसी मऱ्हाटी सुंदरी । भाषांमध्ये ।।६।।

ऐसी मऱ्हाटी सुंदरी । ते संस्कृता शोधु करी ।
शटिक बैसवी हृदयमंदिरी । अज्ञानाची ।।७।।

मूर्ख हृदयातें बोधी । विविध अर्थात शोधी ।
अज्ञानाची बोधी मऱ्हाटी पैं ।।८।।

मूर्खांशि चतुरा करी । साधु दावी सारासारी ।
ज्ञातव्य वाखाणी संसारी । मऱ्हाटी हे ।।९।।

बहुत संस्कृती अनुरागु । सर्वशास्त्री विचारू चांगु ।
परि मऱ्हाटी वांचूनी पांगु । कवण फेडी ।।१०।।

मऱ्हाटी बोलतां बरवी । सर्वत्र जाणीव मिरवी ।
दुर्जनांकरवी सांडवी । पाषांड हे ।।११।।

ऐसिया मऱ्हाटिया पवित्रा । लेणें करीत अध्यात्मशास्त्रा ।
बहुतां लोकांसि पवित्रा । करविया ।।१२।।



● संत ज्ञानेश्वर ● योगवासिष्ट (१-२९४ ते ३०७)

## ७ मराठी : राजभाषा




भाषावार प्रांतरचनेनुसार दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून स्वतंत्र राज्याचा प्रशासनिक कारभार मराठी भाषेतून करण्याकरिता महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ अन्वये मराठी भाषा ही राजभाषा म्हणून अमलात आली.

## १० विश्व मराठी साहित्य संमेलन उत्साहात




पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात मराठी भाषा विभाग यांच्या वतीने ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तिसरे विश्व मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या विश्व मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा 'साहित्य भूषण' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## कृत्रिम बुद्धिमत्ता व औषधे १८



AI हा सध्याच्या घडीचा प्रचलित शब्द झालाय. (Artificial Intelligence) कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर विविध क्षेत्रात होत आहे. या तंत्रज्ञानाचा रोरोन विझ हा जनक मानला जातो.

## १९ क्षण हसरे झाले...



कायापालट पथकाच्या माध्यमातून एकलव्य निवासी आश्रमशाळेची पाहणी करण्यासाठी गेलो असताना, वर्गावर जाताना भिंतीवरील दलाई लामा यांचे 'दुसऱ्यांना आनंद मिळावा म्हणून माझ्याकडून काही मदत होतेय काय, असा प्रश्न स्वतःलाच विचारा' हे वाक्य वाचून स्तब्ध झालो. खरंच आपल्या वागण्यातून दुसऱ्यांना आनंद होतो आहे काय?

## २३ अनात्म–एक शोध

आत्मवादाच्या विरोधी सिद्धांत म्हणजे अनात्मवाद असे म्हणता येईल. अनात्मवादात आत्म्याचा निषेध केला आहे. भगवान बुद्ध हे अनात्मवादी होते. अनात्मवाद हाच मुळी बुद्ध दर्शनाचा पाया आहे. अनात्मवादात आत्म्याचे संपूर्णतः निराकरण केले आहे.

## कोणार्क : एक शिल्पकाव्य ३०

कोणार्क शब्दाचा अर्थ कोनामधील अर्क. अर्क म्हणजे सूर्य. एका कोपऱ्यात म्हणजे कोनात असलेले सूर्यमंदिर म्हणजे कोणार्क. कोणार्कचे सूर्यमंदिर हे एक आश्चर्यच आहे. येथील शिल्पकला अद्वितीय आणि आपला पुरातन वारसा सांगणारी आहेच; पण या सूर्यमंदिराशी निगडित अनेक कथा व इतिहास उपलब्ध आहे.



## दौशाड ३५

'दौशाड' हे माझा आत्मचरित्रपर संघर्षातून साहित्याची निर्मिती झालेलं पुस्तक २८ मार्च २०२४ रोजी राजहंस या पुण्यातील नामांकित प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे.

## भूक ३७

मुंबईत आल्यावर सुरुवातीच्या दिवसात एका होटेलमध्ये कपबश्या विसळण्याचं काम करताना पहिल्यांदा डोसा, सामोसा, ढोकळा अशा पदार्थांचा वास घेतला होता. मालकाकडे फक्त चहाची बोली असल्यानं या पदार्थांना तोंड लावण्यास त्याला मनाई होती. ग्राहकाने ताटात उष्टा सोडलेला एक सामोसा त्याने आपल्या कपड्यात लपवून ठेवला होता.


| | | | |
|---|---|---|---|
| मराठी : राजभाषा | ७ | अनात्म–एक शोध | २३ |
| विश्व मराठी साहित्य संमेलन उत्साहात | १० | मानसिक स्वास्थ्य मन वढाय वढाय | २८ |
| कविता | १६–१७ | कोणार्क : एक शिल्पकाव्य | ३० |
| कृत्रिम बुद्धिमत्ता व औषधे | १८ | दौशाड | ३५ |
| क्षण हसरे झाले... | १९ | भूक | ३७ |
| मनमोहक खंड्या पक्षी | २१ | | |

वर्ष ३ रे । अंक १ । फेब्रुवारी २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — दयानंद कांबळे
- संकल्पना — अजय भोसले
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ-मांडणी-सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

## पत्ता


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

### प्रतिक्रियांचे स्वागत

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**



# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भीती न आम्हा तुझी मुळी ही, गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला, जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

– कविवर्य राजा निळकंठ बढे

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/ कार्या-३१ (राजशिष्टाचार)
दि. १ फेब्रुवारी २०२३)

# मनोगत



**सुजाता सौनिक**
(मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य)

'आपलं मंत्रालय' हे मासिक नव्या रूपात सुरू होत असल्याची बातमी निश्चितच आनंददायी आहे. प्रशासनातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी हे केवळ निपुण प्रशासक नाहीत, तर उत्तम कवी, लेखक, संगीतप्रेमी, नाट्यकलावंत आणि विचारवंतही आहेत. अशा सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी आणि त्यांना अभिव्यक्त होण्यासाठी हे मासिक निश्चितच एक महत्त्वाचे 'व्यासपीठ' ठरेल.

'आपलं मंत्रालय' हे मासिक म्हणजे केवळ एक माहितीपर मंच नसून एक संधी आहे–स्वतःला नव्याने ओळखण्याची, आपल्या सुप्त गुणांना अभिव्यक्त करण्याची आणि प्रशासकीय व्यवस्थेतील कार्यसंस्कृती अधिक समृद्ध करण्याची. आपल्या दैनंदिन जबाबदाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर अशा व्यासपीठांमुळे मनःशक्तीला उभारी मिळते. तसेच सकारात्मकता वृद्धिंगत होऊन सहकाऱ्यांमधील परस्पर संवाद अधिक दृढ होतो.

सदर मासिक मंत्रालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी केवळ एक संवादाचे साधन नसून, एक कुटुंबभावनेला वृद्धिंगत करणारे माध्यम ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे. आपल्या सृजनशीलतेतून नव्या उंची गाठण्यासाठी हे मासिक सर्वांना प्रेरित करेल. त्यामुळे भविष्यात अधिकाधिक अधिकारी, कर्मचारी पुढे येतील, आपल्या प्रतिभेला वाव देतील आणि या मंचाला आपल्या योगदानाने अधिक समृद्ध करतील.

***।। सस्नेह शुभेच्छा ।।***

**सुजाता सौनिक**
(अतिथी संपादक)

# संवादसेतू

सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

कविश्रेष्ठ वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. भारतातील सर्वश्रेष्ठ भाषांपैकी एक असलेल्या भाषेला अलीकडेच अभिजात भाषेचा दर्जा लाभला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला अमृताची उपमा दिली आहे. अमृतासारखी अवीट गोडी असलेल्या मराठी भाषेत दर्जेदार साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणात होत असते.




मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून या महिन्यापासून 'आपलं मंत्रालय' या नियतकालिकेची डिजिटल आवृत्ती प्रकाशित करण्यात येत आहे. हे नियतकालिक सुरू करण्याचा मूळ हेतू आपल्या परस्परांमधील सुसंवाद वाढावा हा आहे. हा प्रतिसाद द्विगुणित होण्यासाठी अधिकाधिक अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या विभागात घडणाऱ्या घटना, घडामोडींची माहिती 'आपलं मंत्रालय'कडे पाठवावी. आपल्या विभागात नवे काही उपक्रम राबवण्यात येत असल्यास त्यांची माहिती छायाचित्रांसह पाठवावी. आपल्या प्रत्येक उपक्रमास 'आपलं मंत्रालया'त ठळकपणे स्थान दिलं जाईल. 'आपलं मंत्रालय' हे तुमचं स्वतःचं हक्काचं व्यासपीठ आहे. या व्यासपीठाची उपयुक्तता, सर्जनशीलता वाढवण्यासाठी आपण सारे जण कटिबद्ध होऊ या.

मराठी भाषा साहित्यापुरती मर्यादित न राहता तंत्रज्ञान, विज्ञान, व्यवस्थापन, एआय, कृषी, पर्यावरण अशा विविध क्षेत्रातही माहिती मराठीत उपलब्ध व्हावी, या दृष्टीने 'रिडर डायजेस्ट'च्या धर्तीवर या वर्षीपासून 'आपलं मंत्रालय' मासिक आपल्या सहकार्याने आधुनिक स्वरूपात प्रकाशित करण्याचा मानस आहे. याकरिता संकुचित परिघातून बाहेर पडून लेखन सहकार्याकरिता लेखकांचा सहभाग व्यापक पातळीवर वाढविण्यात येणार आहे.

मंत्रालयात वर्षानुवर्षे काम केल्यामुळे सहकारी, कर्मचारी व वरिष्ठ यांच्याशी आपले दृढ नातेबंध निर्माण होतात. अनेकांशी घट्ट मैत्री होते. आपल्या सुखदुःखाच्या समयी हीच मंडळी मदतीसाठी धावून येतात. आनंदाच्या क्षणी सामील होऊन आनंद द्विगुणित करतात, तर आपल्या दुःखाच्या समयी तत्परतेने दिलासा देऊन ते दुःख मोरपिसासारखं हलकं करतात.

वेगवेगळ्या स्वभावाच्या वरिष्ठांसोबत त्यांच्या विविध अनुभवसिद्ध कार्यशैलीचं आपणास दर्शन घडतं. त्यातून आपणास बरंच काही शिकता येतं. त्या कार्यशैलीचा अंगीकार करून आपणही आपले कार्य अधिक प्रभावी आणि लक्षणीय व्हावे, यासाठी सतत प्रयत्नशील राहतो.

सरकारी कामकाजाच्या क्लिष्ट, व्यस्त कार्यशैलीच्या कामात स्वत:तील सुप्त कलागुणांना वाव देण्यास वेळच मिळत नाही. तुमच्या कलागुणांना संधी मिळावी व तुमचा आनंद द्विगुणित व्हावा, यासाठी 'आपलं मंत्रालय' हे हक्काचं व्यासपीठ आहे. तुम्ही या! लिहा! आपले अनुभव व्यक्त करा किंवा काही वैशिष्ट्यपूर्ण घटना, विविध क्षेत्रातील माहिती आपणाकडे असल्यास आम्हास सांगा. या 'आपलं मंत्रालय'च्या माध्यमातून आपल्यातील संवादसेतू असाच दृढ करून एकमेकांचे प्रेरणादायी स्रोत होवू या!

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# मराठी : राजभाषा

भाषावार प्रांतरचनेनुसार दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून स्वतंत्र राज्याचा प्रशासनिक कारभार मराठी भाषेतून करण्याकरिता महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ अन्वये मराठी भाषा ही राजभाषा म्हणून अमलात आली. यासाठी स्वतंत्र नियम तयार करण्यात आले असून, हे नियम महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम १९६६ अन्वये कार्यान्वित करण्यात आले आहेत. प्रशासनामध्ये मराठीचा वापर करण्याचे धोरण सन १९६४ पासून अमलात आले असले, तरी त्याबाबत अनेकांना पुरेशी माहिती नसल्यामुळे एकूणच मराठीच्या प्राचीनत्वाची, उज्ज्वल संस्कृतीची माहिती सर्वांना व्हावी म्हणून हा लेख लिहिण्याचे योजिले आहे.




## पार्श्वभूमी

मराठी भाषा ही खूप प्राचीन असली तरी, त्याचा इतिहास अनेक जणांना अवगत नाही. मराठीतील पहिला शिलालेख २,२०० वर्षांपूर्वी ब्राम्ही लिपीत आढळून येत असला, तरी मराठीतील पूर्ण वाक्य असलेला शिलालेख कर्नाटकातील श्रवण बेळगोळ येथे श्री गोंमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. (इ.स. ९८३) त्यातील वाक्य खालीलप्रमाणे आहे.

***श्री चामुण्डराये करवियते***

मराठीचे प्राचीन स्वरूप महारठ्ठी, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंष मराठी असे कालप्रवाहात इतर भाषांप्रमाणे बदलत गेले आहे. त्याचे अद्ययावत स्वरूप म्हणजे आज बोलली जाणारी मराठी भाषा. कोकणी, मालवणी, वऱ्हाडी, सातारी बोलीभाषेचा लहेजा वेगळा असला, तरी ती मराठीचीच सख्खी भावंडे आहेत. शिलालेख, ताम्रपट इत्यादीच्या आधारे मराठी भाषेचा पट उलगडता येतो. अभिजात मराठी भाषा समितीने मराठीच्या कालानुरूपे बदलत जाणाऱ्या स्वरूपाबद्दल खालीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे.

सातवाहनकालीन महाराष्ट्री भाषा ही ज्ञानेश्वरकालीन मराठीचेच जुने रूप आहे. शालिवाहनाच्या आरंभी लोक जी महाराष्ट्री बोलत तीच वाढत वाढत बाराव्या शतकात नागर मऱ्हाठी झाली. हजार बाराशे वर्षे मराठी भाषा तयार होत होती. ओघ एकच; पण पूर्वी जिला महाराष्ट्री म्हणत तिलाच सुसंपन्न स्थितीत मऱ्हाठी म्हणू लागले. ल.रा.पांगारकर हे राजवाडे आणि इतर विद्वानांच्या मताचा संदर्भ घेऊन म्हणतात की, 'तीनही भाषा (महाराष्ट्री, अपभ्रंश आणि मऱ्हाठी) भिन्न नसून काल आणि व्यवहार यांच्या योगाने पालटत जाणाऱ्या एकाच भाषेची ही तीन रूपे आहेत किंवा तीनही मिळून एकच भाषा आहे.'

## इतिहास

आजच्या मराठीच्या स्वरुपाचा पाया अति प्राचीन इ. स. पू.२००० च्या कालावधीतील सातवाहन घराण्यात दिसून येतो. त्यानंतरच्या काळात संस्कृत किंवा कन्नड भाषेला राजाश्रय लाभल्याने मराठी भाषेचा विकास मंदावला. यादवांच्या काळात या भाषेला पुन्हा उभारी मिळाली. दरम्यानच्या काळात मोगली आक्रमणाने पर्शियन भाषेचा प्रादुर्भाव वाढू लागला, अशा स्थितीत वारकरी संप्रदायाने कीर्तन/अभंग स्वरूपाने मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे काम केले.

भाषेचं नेमकं महत्त्व ज्ञात होण्यासाठी 'जाणता राजा' असणे आवश्यक असते. असे उत्तम प्रशासक छत्रपती शिवाजी महाराजांच्या रुपात आपणास लाभले हे मराठीचे व महाराष्ट्राचे अहोभाग्यच होय. छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, व्यावहारिक, सामाजिक समज अत्युच्च दर्जाची होती. त्यांनी स्थानिक भाषेचे महत्त्व वेळीच ओळखून प्रशासनात प्रभावी वापर केला. या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज व्यवहार कोशाची निर्मिती. त्यावेळी मराठी भाषेचा दबदबा भारतभर पसरला होता. इंग्रजांच्या आक्रमणानंतर भाषेची पिछेहाट सुरू झाली. मराठी भाषेच्या जतन, संवर्धनासाठी आपल्याला आवर्जून उपक्रम राबवावे लागत आहेत. कारण लोकांच्या मेंदूवर बसलेला इंग्रजी अजगररूपी विळखा.

मराठीतला उपलब्ध असलेला 'गाथा सप्तशती' हा सुमारे २००० वर्षे जुना ग्रंथ आहे. १२व्या शतकात जैन लेखकांनी प्रामुख्याने कथा, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, अध्यात्म, ज्योतिष, भुगोल अशा विविध मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. १२व्या शतकापासून १७व्या शतकापर्यंत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामेदव, चोखामेळा, एकनाथ इत्यादींचे लेखन आढळून येते. त्यानंतर मोरोपंत, वामन पंडित विष्णूशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. प्राचीन काळी मराठी भाषेत मुख्यत: पद्य स्वरूपात लिखाण झालेले आहे. गद्य स्वरूपातील मोठ्या प्रमाणावरील लिखाण १८व्या शतकानंतर आढळून येते.

## भाषेची स्थिती

जगामध्ये सुमारे ६००० भाषा अस्तित्वात आहेत. त्यातील २० लाखाच्या वर बोलतात, अशा भाषा ३५० आहेत. मराठीचा क्रमांक जागतिक क्रमवारीत १५वा आहे. भारतात हिंदी, बंगाली, तेलगुनंतर मराठी चौथ्या क्रमांकावर आहे. मराठी गोवा प्रशासनाची सह-प्रशासनिक भाषा आहे. या शिवाय ती गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक इत्यादी प्रदेशातही काही प्रमाणात बोलली




जाते. बडोदा विद्यापीठ, उस्मानिया विद्यापीठ, गोवा विद्यापीठ येथे मराठी भाषेचे स्वतंत्र विभाग आहेत. मराठी भाषेला स्वतंत्र व्याकरण पुस्तक अस्तित्वात नव्हते. मराठीतले पहिले व्याकरण पुस्तक विल्यम कॅरी या ब्रिटिश विद्वानाने प्रसिद्ध केले, तर कॅप्टन जर्व्हिसने मराठीत पहिल्यांदा गणित विषय पुस्तकाची निर्मिती केली.

### शासनाचा सहभाग

वरीलप्रमाणे परिस्थिती असली तरी, अनेक प्रादेशिक भाषांमध्ये इतर भाषांचे विशेषतः इंग्रजीचे प्राबल्य वाढत चालल्यामुळे स्थानिक भाषा लोप पावतील काय अशी भीती निर्माण झाली आहे. इतर भाषांचा प्रादुर्भावही झपाट्याने वाढत चालला आहे. या परिस्थितीत मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी १ मे १९९२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली. या शिवाय मराठीच्या संवर्धनासाठी मराठी साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषेच्या शब्दकोश समृद्धीसाठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांची स्थापना करण्यात आली आहे. इतर अनेक संस्था स्वयंस्फूर्तीने त्यांच्या स्तरावर वेगवेगळ्या माध्यमातून मराठीच्या प्रसारासाठी काम करत आहेत.

मराठीच्या प्रसारासाठी शासनस्तरावर अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत. मराठी भाषेचे प्राचीनत्व विचारात घेऊन मराठीला अभिजात दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. या समितीने भाषेची प्राचीनता, मौलिकता व सलगता, प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यात असलेले नाते विचारात घेऊन आपला अहवाल शासनास सादर केला होता. हा अहवाल केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे. केंद्र शासनाने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. तसेच मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वंकष मराठी भाषा धोरण तयार करण्यात आले आहे. प्रशासनाच्या अंतर्गत असलेली विविध क्षेत्रीय कार्यालये विखुरलेली असल्यामुळे सर्व कार्यालयांना एकाच छत्राखाली सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मुंबई येथे मराठी भाषा भवन निर्माण करण्याचा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन, वाचन प्रेरणा दिन इत्यादी माध्यमातूनही मराठीची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य जोमाने सुरू आहे. सर्व विषयातील शब्द मराठी भाषेत उपलब्ध असण्याच्या दृष्टीने विश्वकोश मंडळाच्या उपक्रमांतर्गत विविध खंड प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सदर विश्वकोश भ्रमणध्वनी उपयोजकावरही उपलब्ध आहेत.

भाषा संचालनालयांतर्गत अनेक राज्य कायद्यांचे मराठीकरण करण्यात आले आहे. शासन व्यवहारात व न्याय व्यवहारात मराठीचा वापर प्रभावीपणे होण्यासाठी अनेक परिभाषा कोश निर्माण करण्यात येत आहेत. असा कोश आता भ्रमणध्वनी उपयोजकावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. भाषा संचालनालयाने विविध विषयांचे जवळ–जवळ २९ परिभाषा कोश प्रसिद्ध केले आहेत. १० परिभाषा कोशाचे काम हाती घेण्यात आलेले असून, नवीन ३० परिभाषा कोश प्रस्तावित आहेत. राज्य मराठी विकास संस्था मराठीचा वापर अधिक गुणवत्तापूर्ण होण्यासाठी चर्चासत्र, प्रकाशने या माध्यमातून मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम पार पाडत आहे.

राज्य मराठी विकास संस्थेमार्फत इतर राज्यातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत, महाराष्ट्राबाहेर काम करणाऱ्या संस्थांना मदत, पुस्तक प्रदर्शन, मोडी हस्तलिखितांचा अभ्यास, अमराठी भाषिकांसाठी उपक्रम, मराठी दुर्मीळ ग्रंथांचे संगणीकरण, संस्थेच्या प्रकरणात प्रकाशनाचे ई–पुस्तक स्वरूपात रूपांतर करणे असे महत्त्वाचे उपक्रम राबवण्यात येतात. त्यातील पुस्तकांचे गाव : हा लोकसहभागातून साकारलेला आगळावेगळा नावीन्यपूर्ण प्रकल्प महाबळेश्वरजवळील भिल्लार या गावी कार्यान्वित करण्यात आला आहे. भिल्लार गावात सार्वजनिक ठिकाणच्या जागा निवडण्यात आल्या असून पर्यटकांना तेथे सहजपणे पुस्तके वाचता येतील अशी योजना आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळातर्फे मुख्यतः साहित्य, संस्कृती, इतिहास, विज्ञान, तंत्रज्ञान इ. विषयावर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी चालना देण्याचे काम करण्यात येत आहे. त्या अंतर्गत पुस्तक प्रकाशन उपक्रम, नवलेखकांना उत्तेजन, साहित्य संस्थांना अनुदान इ. उपक्रम राबवण्यात येतात. साहित्य संस्कृती मंडळाने आतापर्यंत अनेक ग्रंथ प्रकाशित केले असून, त्यापैकी काही पुस्तकांचे संगणकीकरणाचे काम सुरू आहे.

मातृभाषेतून एखाद्या विषयाचे आकलन सहजपणे होते, हे सर्वसाधारण सत्य आहे. आतापर्यंत विविध विषयांचा मातृभाषेत विचारच न झाल्यामुळे त्या त्या विषयातील शब्द आज उपलब्ध नाहीत. संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान याचा विचार मराठीतून करावा लागेल. लिखाण मराठीतून करावे लागेल. इंग्रजी समृद्ध ज्ञानभाषा होऊ शकली कारण जगातला असा कुठलाही विषय नाही ज्याचा इंग्रजीतून विचार झालेला नाही. असे असताना चीन, जर्मन, जपान, फ्रान्स हे त्यांच्या भाषा ज्ञानभाषा म्हणून कसे विकसित करू शकले? त्यांना का नाही ज्ञानाच्या मर्यादा आल्या? याचे कारण,



मराठी भाषेतील अनेक विषयातील परिभाषा कोश उपलब्ध असले, तरी मराठीचा वावर सर्व क्षेत्रात होण्याइतके भाषेचे प्राबल्य नाही. याकरिता सर्व मराठी जनांनी मनापासून आपापले योगदान देणे आवश्यक आहे.

ज्ञानभाषा होण्यासाठी फक्त अलंकारिक साहित्य पुरेसे नाही. केवळ काही मोजक्या लेखकांच्या अलंकारिक भाषेतील पुस्तकांमुळे आपल्या भाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त होऊ शकणार नाही. जगातल्या जवळजवळ सर्वच विषयांचा विचार व लिखाण करावे लागते. आपल्या पूर्वजांकडे ज्ञानाचे भंडार होते; परंतु ते लिखित स्वरूपात जतन न केल्याने आपले फार मोठे नुकसान झाले आहे. आर्यभट्ट यांनी पृथ्वीचा आकार इत्यादीबाबत विचार केला होता. परंतु लिखित ज्ञान जतन न केल्याने पुढच्या पिढीला याबद्दल माहिती नव्हती.

## उत्तरदायित्व

पूर्वीच्या लिखाणाकडे पाहिले असता अध्यात्म तसेच ललित लेखन विपुल प्रमाणात आढळते. विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन शास्त्र, मानसशास्त्र असे अनेक जागतिक स्तरावर हाताळल्या जाणाऱ्या विषयांवर मराठीत फार कमी लिखाण झाले आहे. अलीकडे निरंजन घाटे, फडके, अच्युत गोडबोले इ. लेखकांनी प्रचलित विषयापेक्षा अन्य विषयातून लिखाण करायला सुरुवात केली आहे. कोणतीही भाषा ज्ञानभाषा होण्यासाठी जगात ज्ञात असणाऱ्या सर्व विषयात त्याचे लिखाण व वापर आवश्यक असतो. वरील लेखकांनी विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन इत्यादी विषय मराठीतून उत्कृष्ट प्रकारे मांडता येऊ शकतात, हे दाखवले आहे.

कोणतीही भाषा ज्ञानभाषा असल्याशिवाय ती समृद्ध होऊ शकणार नाही. ती समृद्ध होण्यासाठी अगदी झपाटून काम करण्याची गरज आहे. यासाठी प्रत्येकाने मराठीच्या विकासात खारीचा वाटा उचलला पाहिजे.

**टीम आपलं मंत्रालय**

## मराठिया

जैसी हरळांमाजी रत्नकिळा।
कि रत्नांमाजि हिरा निळा।
तैसी भासांमाजि चोखाळ।
भासा मराठी।।

जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी।
किं परिमळांमाजि कस्तुरि।
तैसी भासांमाजि साजिरी।
मराठिया।।

पाखियांमधे मयोरु।
ब्रुखियांमधे कल्पतरु।
भासांमधे मानु थोरु।
मराठियेसी ।।

तारांमधे बारा रासी।
सप्तवारांमधे रवि-ससी।
या दीपिचेआं भासांमध्ये तैसी।
मराठिया।।

– ख्रिस्तदास थॉमस स्टीफन्स






**पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात मराठी भाषा विभाग यांच्या वतीने ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत तिसरे विश्व मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडले, तर पुढील वर्षात होणारे चौथे विश्व मराठी साहित्य संमेलन हे नाशिक येथे आयोजित करण्यात येईल, अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली. या विश्व मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा 'साहित्य भूषण' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**

# विश्व मराठी साहित्य संमेलन उत्साहात

३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न झालेल्या तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत आणि देशातून, राज्यातून, परदेशातून आलेल्या साहित्यिक, मराठीप्रेमींच्या प्रचंड उत्साहात उद्‌घाटन झाले.

### कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मराठीतील आपले अभिजात साहित्य पुढच्या पिढीकरिता कसे नेता येईल यादृष्टीने चॅट-जीपीटी सारखे एखादे 'स्मॉल लँग्वेज मॉडेल' तयार करण्यासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला त्यांचे मनापासून आभार मानतो, हा दर्जा देण्याचे भाग्य लाभले असा उल्लेख श्री. मोदी यांनी केला आहे. प्रमाण मराठीच्या माहेरघरी आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले संमेलन होत आहे, ही खरोखर आपल्या सगळ्यांकरिता अतिशय आनंदाची गोष्ट आहे. या संमेलनाला महाराष्ट्रातून, इतर राज्यांतून, परदेशातून मराठीप्रेमी, साहित्यिक आले असून, मराठी भाषा विभागाने खऱ्या अर्थाने हे संमेलन वैश्विक अशा दर्जाचे केले आहे. जगाच्या पाठीवर एकही देश असा नाही जिथे मराठी माणूस पोचलेला नाही. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम येथे गेलो असता तेथील एका चिमुरड्याने 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे सुंदर गीत म्हणून दाखवले हे पाहून अभिमान वाटला की, मराठी माणूस इतक्या वर्षांपासून परदेशात गेला तरी माय मराठी



त्याच्यापासून दुरावली नाही आणि ती पुढच्या पिढीकडे पोहोचवण्यासाठी प्रयत्न करतो आहे.

लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,' हा जो नारा दिला किंवा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्या प्रकारे क्रांतिकारकांमध्ये स्फुरण चढविले. दादासाहेब फाळके यांनी सिने सृष्टीची निर्मिती केली, गानकोकिळा लता मंगेशकर किंवा सचिन तेंडुलकर आदी अनेक नावांची मांदियाळी आहे की, ज्यांच्याकडे पाहिल्यानंतर मराठी असल्याचा अभिमान आपल्या सगळ्यांना येतो. या संमेलनाच्या माध्यमातून जगभरातल्या मराठी माणसाला हीच मराठीची परंपरा पुढे नेण्याचीच नव्हे, तर जगभरात मराठी जगवायची, टिकवायची, समृद्ध करायची आहे अशा प्रकारची साद देखील घालत आहोत. इंग्लंडमधील मराठी मंडळाला त्या ठिकाणी जागेच्या संदर्भात आवश्यक ती मदत येत्या १५ दिवसांमध्ये निश्चितच देण्यात येईल. तसेच दिल्लीतील मराठी शाळादेखील अव्याहत चालल्या पाहिजेत. याकरिता महाराष्ट्र शासन आवश्यक ती मदत करेल, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

## विश्व मराठी संमेलन म्हणजे महाकुंभमेळा

'मराठी तितुका मेळवावा...' असे सांगणाऱ्या या विश्व मराठी संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. माझी भाषा अभिजात आहे, ही भावनाच अभिमान निर्माण करणारी आहे. आपली भाषा प्राचीन आहे, आजही प्रचलित आहे. माझ्या मराठी भाषेत उत्तम साहित्य निर्माण होतं, हे पुराव्यानिशी आपण सिद्ध केले. त्यानंतरच हा अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. हे विश्व मराठी संमेलन म्हणजे पुस्तक आणि पुस्तकांचे निर्माते यांचाच हा महाकुंभमेळा आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मराठी भाषेला जवळपास २ हजार वर्षांपूर्वीचा इतिहास असल्याचे आपण केंद्राला सिद्ध करून दिले. त्यासाठी साहित्य परिषदेने एक मोठा पुरावा केंद्राला सादर केला होता. जुन्नर तालुक्यातला नाणेघाटातील लेणीमध्ये दगडी भिंतींवर कोरलेला सातवाहन शिलालेख हा तो मौल्यवान पुरावा असून तो आपल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे. विश्व मराठी संमेलनात तब्बल २२ देशांतून तीनशे मराठीप्रेमी आलेले आहेत. आज तीनशे आहेत, पुढच्या वर्षी हाच आकडा वाढेल. ही मराठी १९३ देशात पोहोचायला हवी हे आमचे स्वप्न आहे. या स्वप्नाला प्रयत्नांची जोड दिली तरच ते साकार होईल. ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानातून 'आता विश्वात्मके देवे' अशी साद घातली. नामदेवांना ७०० वर्षांपूर्वी मराठीच्या विश्वव्यापी परिणामाची जाणीव होती, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



वैश्विक भाषा किंवा विश्वाची भाषा म्हणजे जी भाषा सर्वांना जोडते, जात पात धर्माच्या पलीकडची माणुसकी शिकवते, तीच भाषा खऱ्या अर्थाने विश्वाची बनते. हे सर्व गुण आपल्या मराठी भाषेत ठासून भरले आहेत. जगात सात हजार भाषा आहेत. एकट्या भारतात १२१ भाषा आहेत. जवळपास २० हजार बोलीभाषा आपल्या देशातच बोलल्या जातात. या सगळ्या भाषांशी मराठीने आपले नाते जोडले पाहिजे. तेव्हाच माझी अभिजात मराठी वैश्विक मराठी होईल, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

मराठी सर्वार्थाने समृद्ध भाषा आहे. आता ती ज्ञानभाषा व्हायला हवी. आज तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे म्हणजे एआयचे आहे. आता संवादाची भाषाही तंत्रज्ञान ठरवतंय. त्यामुळे आपल्या समोरचे आव्हान मोठे आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून उच्च शिक्षणावर भर दिला आहे; पण त्यात अनेक अडचणी आहेत. विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण, संगणक अशा अनेक विषयांत मराठीत उत्तम पुस्तके नाहीतच. विज्ञानाच्या विषय, अभियांत्रिकीसह सर्व विषयांत मराठीतून सोपी पुस्तके येणे गरजेचे आहे. मराठी ही नुसती ज्ञानभाषा नाही, तर व्यवहार्य भाषा व्हायला हवी. रोजगारासाठी म्हणजे अर्थार्जनासाठी आवश्यक भाषा व्हायला हवी, त्यासाठी आपल्या सर्वांना मिळून ठोस प्रयत्न करावे लागतील. हे प्रयत्न महाराष्ट्र धर्म वाढवण्याइतकेच महत्त्वाचे आहेत, असेही श्री. शिंदे म्हणाले.



## महाराष्ट्राला सार्थ अभिमान

आपला महाराष्ट्राभिमान हा फक्त, चांद्यापासून बांद्यापर्यंत, महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमांपुरता मर्यादित नाही. देशाच्या, जगाच्या कानाकोपऱ्यात ज्या-ज्या ठिकाणी मराठी माणसांनी झेंडा रोवला, ज्या-ज्या ठिकाणी मराठी माणसाने पाऊलखुणा उमटवल्या.- इतिहासातल्या आणि वर्तमानातल्या, त्या पाऊलखुणांचा आपल्या सर्वांना आणि महाराष्ट्राला सार्थ अभिमान असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

आपण जेव्हा मराठे म्हणतो, त्यावेळी मराठा ही संकल्पना जातीपुरती मर्यादित नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. मराठी भाषा, मराठी बोली बोलणाऱ्या, सह्याद्रीच्या वाऱ्यांशी, महाराष्ट्राच्या मातीशी नातं असलेल्या, अठरापगड जाती, धर्म, भाषा, पंथाच्या लोकांना एकत्रित आणून मराठा किंवा मराठे ही संकल्पना अस्तित्वात आली, हे लक्षात घेतलं पाहिजे.

मधु मंगेश कर्णिक हे मराठी साहित्यविश्वाशी गेली ७५ वर्षांहून अधिक काळ, एकरूप झालेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा साहित्यिक प्रवास आज २०२५ मध्ये येऊन पोहोचला आहे. मराठी साहित्य क्षेत्रातल्या प्रत्येकाला मधु मंगेश कर्णिक यांनी आपले केले आहे, अशा शब्दांत श्री. पवार यांनी त्यांचा गौरव केला.

तिसरे मराठी विश्व संमेलन पुण्यात होत आहे. यापुढील संमेलने छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आदी ठिकाणीही व्हावीत; परंतु, पुढील पाच वर्षांतील एक तरी मराठी विश्व संमेलन परदेशात घेऊयात. त्यासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घ्यावा, असेही ते म्हणाले.

जगाच्या इतिहासात रयतेचे राज्य स्थापन करणारे पहिले राजे, छत्रपती शिवाजी महाराज या महाराष्ट्रात जन्माला आले. देशातली पहिली मुलींची शाळा महाराष्ट्रात सुरू झाली. बहुजनांच्या दारात शिक्षणाची गंगा नेण्याचं काम, शाहू, फुले, आंबेडकर या महामानवांनी महाराष्ट्रात केले. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व महाराष्ट्राने केले. याच महामानवांच्या विचारांचा, कार्याचा वारसा पुढे नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्यासाठी भावी पिढीच्या मनात विचारांची पायाभरणी करण्याचे काम, या विश्व मराठी संमेलनातून व्हावे, अशी अपेक्षाही श्री. पवार यांनी व्यक्त केली.

## मराठी भाषेचे संवर्धन

मराठीवर प्रेम करणाऱ्या साहित्यिक लोकांनी मराठीला अभिजात दर्जा मिळावा म्हणून खूप मोठी चळवळ केली. त्याला यश आले. पुण्याला सांस्कृतिक नगरी म्हणून ओळखले जाते, मराठीसाठी पुणे विद्यापीठाची स्थापना झाली होती म्हणून पुणे येथे हे तिसरे संमेलन व्हावे अशी आमची भूमिका होती. हा शासनाचा कार्यक्रम असला, तरी सर्व पुणेकरांनी हा कार्यक्रम उचलून धरला. मराठी भाषेचे संवर्धन, जतन झाले पाहिजे आणि प्रचार व प्रसार झाला पाहिजे, असे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मराठी भाषा आहे तशी टिकविणे, मराठीची अस्मिता टिकवणे आणि मराठी भाषेवरील आक्रमणाचा आक्रमक पद्धतीने प्रतिकार करण्याची युवा पिढीची जबाबदारी आहे. हे करताना ज्यांनी ज्यांनी मराठी भाषा लिहिली, वाढवली त्या सर्वांचा आदर्श दीपस्तंभाप्रमाणे स्वत:समोर ठेवला पाहिजे. यामुळे विश्व मराठी संमेलनातील पहिला साहित्य भूषण पुरस्कार मधु मंगेश कर्णिक यांना देण्यात आला असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.




## 'प्रशासनातील मराठी भाषा' या विषयावर परिसंवाद

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून नागरिक आणि प्रशासनातील मराठी भाषा यातील दरी दूर करता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

विश्व मराठी संमेलनात सावित्रीबाई फुले मंचावर 'प्रशासनातील मराठी भाषा' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते. या परिसंवादात 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त राजीव नंदकर, वस्तू व सेवा कर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त वैशाली पतंगे यांनी भाग घेतला. परिसंवादाचे निवेदन बालभारतीचे संपादक किरण केंद्रे यांनी केले.

रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड हे कवी केशवसुतांचे जन्मगाव त्यांचे स्मारक उभारून श्री. कर्णिक यांनी जगभरात प्रसिद्ध केले. ते पुढील वर्षी पुस्तकांचे गाव करण्यात येईल व त्याला आवश्यक तो निधी देण्यात येईल. याशिवाय मराठी वाढवणारी, मराठीला ताकत देणारी, सातासमुद्रापार नेणारी महनीय व्यक्ती ज्या गावात जन्माला आली असेल, अशी राज्यातील गावे शोधून त्यांचा समावेश पुस्तकांचे गाव, कवितांचे गाव योजनेत करण्यात येईल, असे श्री. सामंत यांनी सांगितले.

हे साहित्य संमेलन साहित्यापुरते मर्यादित न राहता 'मराठी-३६०' या संकल्पनेनुसार मराठीच्या सर्व पैलूंवर काम करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. मराठी भाषेचा अभिजात दर्जा सतत वृद्धिंगत होत जाईल, यासाठी मराठी भाषा विभाग सातत्याने प्रयत्न करेल, असे श्रीमती पाटणकर-म्हैसकर यांनी प्रास्ताविकात सांगितले.

या संमेलनाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुख्य मंचात झालेल्या या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर आदी उपस्थित होते.

प्रशासनामध्ये वापरली जाणारी भाषा लोकांना समजणारी नसेल तर शासनाच्या योजना, कामकाज परिणामकारक होणार नाहीत. संवाद आणि पत्रव्यवहाराच्या माध्यमातून प्रशासनामध्ये मराठी भाषा वापरली जाते. त्यामुळे हा पत्रव्यवहार नागरिकांना समजेल, उमजेल अशा मराठी भाषेत असावा. प्रशासकीय यंत्रणा ही जनतेचे प्रश्न सोडवणारी यंत्रणा आहे. त्यामुळे प्रशासनामधील मराठी भाषा ही लोकांना समजणारी असावी. पत्रव्यवहार करताना प्रशासनामध्ये इतर भाषेतील शब्द जसेच्या तसे मराठीमध्ये येण्याची आवश्यकता नसते. इतर भाषेतील अनेक शब्दांना पर्यायी शब्द मराठीमध्ये शोधले आहेत. क्रीडांगण, नभोवाणी, विश्वस्त असे अनेक शब्द सावरकरांनी मराठीमध्ये आणले आहेत. असे अनेक शब्द मराठीमध्ये रुळले आहेत, असे श्री. खारगे यांनी सांगितले.

मराठी भाषा विभागाने शब्दकोश, पदनाम कोश, परिभाषा कोश असे २९ कोश तयार केले असून संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. न्यायालयामध्येही मराठी भाषा वापरायला सुरुवात झाली आहे. शासन आणि मराठी भाषा यांच्यातील दरी दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवणे आवश्यक आहे. मराठी भाषेचा विकास करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन विविध विषयांवर परिसंवाद, कार्यशाळा आयोजित कराव्यात. महाराष्ट्र हे सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. महाराष्ट्राची संस्कृती जपण्यासाठी, वाढवण्यासाठी मराठी भाषा अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वजण प्रयत्न करत राहू, असेही त्यांनी सांगितले.

## मराठी उद्योजकांचे चर्चासत्र

संपूर्ण जगात ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेला खूप महत्त्व आहे;

नवकल्पना आणि संशोधनाच्या माध्यमातून ज्ञानाधिष्ठित भारताची निर्मिती करून मोठी मजल मारू शकतो, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

'विश्व मराठी संमेलन – २०२५' अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुख्य मंच येथे आयोजित मराठी उद्योजकांच्या चर्चासत्रात ते बोलत होते. या चर्चासत्रात 'बीव्हिजी ग्रुप'चे प्रमुख हणमंतराव गायकवाड, नाशिक येथील सह्याद्री फार्म्सचे विलास शिंदे, गर्जे मराठी ग्लोबलचे आनंद गानू देखील सहभागी झाले होते. चर्चासत्राचे निवेदन जयू भाटकर यांनी केले.

### मराठी भाषा आणि स्त्री साहित्य विषयी चर्चासत्र

स्त्रियांच्या साहित्यात लिहिण्याची सुरुवात पुरुषांनी केल्यामुळे स्त्रियांचे अंतरंग लेखनातून यायला वेळ लागला. आता स्त्रिया स्वत: लिहीत असल्यामुळे त्यांचे मनोगत व्यक्त होत आहे. स्त्रियांनी चिरस्थायी आणि शाश्वत राहील असे लेखन केले पाहिजे, असे




विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

विश्व मराठी संमेलनात आयोजित मराठी भाषा आणि स्त्री साहित्य विषयी चर्चासत्रात त्या बोलत होते. या चर्चासत्रात मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, साहित्यिका डॉ. सिसिलिया कार्व्हालो यादेखील सहभागी झाल्या होत्या. निवेदन उत्तरा मोने यांनी केले.

स्त्रियांना आपल्या कामाची प्रेरणा अनेकदा पुरुषांकडूनच मिळाल्याचे आपण पाहतो. स्त्री संघटना आणि स्त्रियांनी नेहमी सांगितले आहे की, स्त्रियांची भूमिका पुरुषविरोधी नसून पुरुषी वर्चस्वाविरुद्ध आहे. पुरुषाची भूमिका ही सहकाऱ्याची, मित्राची असावी. पुरुषांचा आणि स्त्रियांचा प्रवास जेव्हा माणूसपणाकडे जाईल, तेव्हा अजून चांगले घडेल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, गेल्या ५० वर्षांत स्त्रियांच्या जाणिवांचा प्रभाव समाजावर मोठ्या प्रमाणात पडला आहे. स्त्रियांना अबला समजण्याची भूमिका आता बदलली आहे. पंचायत राजमध्ये ५० टक्के आरक्षण ही स्त्रियांसाठी महत्त्वाची बाब ठरली आहे. तथापि स्त्रियांकडे पाहण्याची नजर आणि भूमिका बदलणे हे आव्हान अजून समोर आहे. त्यामुळे स्त्रियांनी कोणत्याही टिकेला न घाबरता निर्भीडपणे नेहमी लिहिते राहिले पाहिजे, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

भाषा आणि आशय हे एकाच बाबीचे दोन पैलू आहेत. स्त्रियांनी, स्वत:ला वाटतेय म्हणून लिहिले पाहिजे. आशयाची समृद्धी भाषेतून येते. पूर्वी स्त्रिया घरात असत. त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व खूप छोटे होते. स्त्रिया जेव्हापासून घराच्या बाहेर पडू लागल्या, तेव्हापासून त्यांचे अनुभवविश्व विस्तारले असून आशयसंपन्न लेखन करू लागल्या आहेत. असे असतानाही लेखकाच्या पुस्तकातील पात्रात जी अलिप्तता पाहिजे ती अद्याप स्त्रियांच्या साहित्यात आलेली नाही. हळूहळू अनुभवातून ती यायला काही वेळ लागेल. आजच्या स्त्रिया नोकरी, मोठ्या पदांवर, कॉर्पोरेट जगतात वावरू लागल्या असल्या तरी अद्याप तेथील आशय स्त्रियांच्या साहित्यात आलेला नाही, असे श्रीमती भिडे यांनी सांगितले.

भाषा आणि साहित्य हे काळाला जोडणारे असावे. लेखक, कवी, कवयित्री जेव्हा बोलतात ते समाजाचे मनोगत होते. आपल्या संत कवयित्रींनी श्री विठ्ठलाला आपल्या घरातील पुरुष मानले. त्यातून त्यांनी समस्त स्त्रियांचे मनोगत मांडले. जे आपली पणजी, आजी बोलू शकली नाही ते आताच्या स्त्रिया लिहून व्यक्त होत आहेत, ही चांगली बाब आहे. जितका माणूस सजग होत असतो तितकी भाषेची समृद्धी सतत होत असते. बोलीभाषेत लेखन झाले पाहिजे. काळाच्या पडद्याआड गेलेले शब्द पुन्हा बाहेर काढले पाहिजेत. महिला लेखकांचा कोश, स्त्रियांच्या कार्याचे कोश तयार केले पाहिजेत. व्याकरणाच्या क्षेत्रात त्या पुढे आल्या पाहिजेत. लोकविज्ञानाचे अभियान करण्यात महिला पुढे आल्या पाहिजेत, असे श्रीमती कार्व्हालो यांनी सांगितले.

### तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाची सांगता

राज्य शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता परदेशात आपली मराठी माणसे मराठीचे संवर्धन, जतन करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन या परदेशातील मराठीचे काम करणाऱ्या संस्थांच्या मागे राज्य शासन आर्थिक ताकत निश्चितपणे उभी करेल, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. पुढील वर्षात

होणारे चौथे विश्व मराठी संमेलन हे नाशिक येथे आयोजित करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. यावेळी रितेश देशमुख यांना पहिला 'विश्व मराठी संमेलन-कलारत्न पुरस्कार' देण्यात आला.

व्यासपीठावर राज ठाकरे, सयाजी शिंदे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, माजी आमदार उल्हास पवार, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे आदी उपस्थित होते.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ही भाषा २ हजार वर्षांपूर्वीची असल्याचे पुरावे केंद्राकडे सादर करण्यासाठी १२ वर्षे लागली, परंतु गतवर्षी आपल्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. आता राज्याच्या अर्थसंकल्पात मराठी भाषा विभागाला भरीव तरतूद करण्यात आली आहे. या संमेलनासाठी परदेशातून आलेल्या मराठी माणसांना येण्यासाठी आर्थिक मदत देण्याचे निश्चित करण्यात आले होते; परंतु यापैकी ८० टक्क्यांहून अधिक जणांनी ही मदत नाकारली असून, ती रक्कम मराठीच्या संवर्धनासाठी मराठी भाषा विभागाने वापरावी असे सांगितले आहे. हे मराठी माणसाचे मोठेपण आहे, असेही श्री. सामंत म्हणाले. यावेळी श्री. राज ठाकरे म्हणाले, इतर देश, राज्यातील लोक जसे आपल्या भाषेवर ठाम राहतात. त्याप्रमाणे मराठी माणसाने आपल्या भाषेवर ठाम राहिले पाहिजे. आपल्या साहित्यिकांनी मार्ग दाखविला पाहिजे, बोलले पाहिजे. चांगले-वाईट समाजाला सांगितले पाहिजे. साहित्यिक जेव्हा बोलतील, तेव्हा लोक त्यांना ऐकतील आणि त्यांची पुस्तकेही वाचतील; आणि पुस्तकांतून प्रबोधन होईल. तरुणांनी पुस्तके वाचली पाहिजेत. पुस्तकांचा आणि ज्ञानाचा प्रचार प्रत्येक मराठी घरात गेला पाहिजे. महाराष्ट्र हा मराठी भाषिक म्हणून एकत्र आला पाहिजे, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

अभिनेते श्री. देशमुख म्हणाले, मराठी घरात जन्म घेणे हेच आपले भाग्य असते. आपण १० वर्षांत हिंदी चित्रपटसृष्टीत काम केल्यानंतर वडिलांनी मराठी चित्रपटांच्या अनुषंगाने विचारल्यानंतर 'लय भारी' हा चित्रपट केला जो प्रचंड लोकप्रिय ठरला. गेल्या १३ वर्षांत केवळ मराठी चित्रपटांचीच निर्मिती केल्याचे श्री. देशमुख यांनी आवर्जून सांगितले.

आपले आयुष्य पुस्तकातून घडल्याचे सांगून अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले, दुसऱ्याने सांगून विचार बदलत नसतात. आपण आपल्यापासून सुरुवात केल्यावरच बदल होऊ शकतो. आपल्याला इतर कोणत्याही भाषेतील चित्रपटात काम करायचे असल्यास त्यातील संवाद हे मराठीतच लिहून घेतो आणि बोलतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**संकलन : विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालय, पुणे.**

# आनंदी आयुष्य



आनंदी राहणे म्हणजे उड्या मारणे, नाचणे, मोठ्यामोठ्याने हसणे, जगाला ओरडून सांगणे असे नव्हे, अशी अवस्था आयुष्यात कशात तरी विजय मिळाल्याच्या वेळी येते, परंतु दैनंदिन आयुष्यात आनंदी राहणे म्हणजे सतत उपरोक्त प्रमाणे करत राहणे असे नव्हे, तर आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत दिवसभर अशा एका छानशा अनुभूतीसह प्रत्येक क्षण जगणे होय. आजूबाजूला दिवसभर आपल्यासाठी काहींना काही प्रतिकूल घडतच राहणार आहे. तरीही आपले एक छानसे अनुभूती (feelings) कमी होऊ देता कामा नये. सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मस्त वाटले पाहिजे. हे मस्त वाटणे आतून आणता आले पाहिजे व खूप वेळ टिकवता आले पाहिजे. हे बाहेरच्या वस्तू, घटना यांच्यावर अवलंबून असता कामा नये. आतून मस्त मूड दिवसभर सांभाळून राहणे म्हणजे आनंदी राहणे होय. हे सवर्यींनी साध्य होते. त्यानंतरचे आयुष्य एक मस्त आयुष्य होऊन जाते. आपण असेच आयुष्य जगावे अशी निसर्गाचीही अपेक्षा असते.

**- सुभाष नागप, उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.**

## योजना नाव : ई-फेरफार प्रणाली - मालकीचा हक्क, विश्वासाची नोंद

**लघुवाक्य (टॅगलाइन): डिजिटल नोंदी, खात्रीशीर मालकी!**

### योजनेविषयी माहिती

महसूल विभागाची 'ई-फेरफार प्रणाली' ही जमीन नोंदी डिजिटल स्वरूपात अद्ययावत ठेवण्यासाठी अत्याधुनिक योजना आहे. या प्रणालीमुळे जमिनीच्या मालकीसंदर्भातील सर्व महत्त्वाच्या नोंदी नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन स्वरूपात सहज मिळू शकतात. डिजिटल प्रक्रिया असल्याने व्यवहार अधिक पारदर्शक झाले असून, बेकायदेशीर फेरफारांना आळा बसला आहे.

तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी सतत देखरेख केली जाते. तसेच अधिकृत नोंदी आणि प्रमाणपत्रे ऑनलाइन प्राप्त करण्यासाठी विशेष ई-सेवा पोर्टल कार्यरत आहे. या सुविधेमुळे शेतकरी व नागरिकांना त्यांच्या मालकीची खात्री करून व्यवहारांमध्ये विश्वास वाढला आहे. महसूल विभागाची ही योजना जमिनीशी संबंधित प्रक्रिया सोपी व सुरक्षित बनवण्यास कटिबद्ध आहे.

**- दामोदर दळवी, अवर सचिव, मंत्रालय.**

# कविता

## माय मराठी

माय ज्ञानेशाची, माय तुक्याची
झुंज फिजूल, ऱ्हस्व दीर्घांची...

हा शाप जुनाच मराठी मातीचा...
स्वर स्वरादीतून मार्ग शोधते ती

राजा माझा जाणता, त्याने जाणियलें
मोल मराठी बोलीचे, मातीत रुजविले

तुम्हास का ओझे, अमुचीच माय गे
ज्ञानगंगेच्या प्रवाहात का हरते ती

राज्य मराठीचे हे, रक्त-ओक्षणे झाले
ललाटी भाग्य दीप, जिने रेखियले
तुम्हांस का हो, न्यूनगंडे पछाडले...

आपुल्याच मातीत का दुभंगते ती
वचन माझेच मला, माझ्या मायबोलीचे
स्वप्न माझ्या राजाचे, माझ्या शिवबाचे

दरवळ माय बोलीचा, रुजावा रानोमाळ
स्वप्नातून उभारी, घेईल भरारी ती

ज्ञानदिंडी मराठीची सर्वदूर वावरू दे
एक मात्रा माझीही, या प्रवासात लागू दे...

तीच एक आशा, तीच जाणे गुंफणे...
मराठी मनाला मनाने जोडील ती...

**– अजय भोसले**
**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग)**

*मूळ गुजराती कविता*

બા ને આવ્યો, એટેક,

બે નળીઓ બ્લોક થઇને, બા ને આવ્યો, એટેક,
ભાઇઓ વચ્ચે દિવાલ ઉભી થઇને, ઘરને આવ્યો,
એટેક. (૧)

એંજોય ગ્રાફીને પછી સ્ટેંટ મુકાવ્યુ, ડોકટરોએ
બાને જીવાડવા, સાયન્સ આખુ ઝુકાવ્યુ. (૨)

તીખુ, તળેલુ ને પછી ગળ્યુ, એ બધુ ખાવાનું
ડોકટરોએ,બાને મૂકાવ્યુ.(૩)

ઘર જોતું રહ્યું. આ બધુ, ને પછી સાંભરી આવ્યુ.
(૪)

જો તીખા શબ્દોને પછી,કડવા કટાક્ષો જો કોઇ,
જીવતરના ડાકટર મૂકાવે?

તો, ઉભી થયેલી દિવાલોથી, એ ઘરને બચાવે.
(૫)

અંકુર શ્રીમાળી

*कवितेचा मराठी अनुवाद*

## बा ला आला ॲटॅक

दोन नळ्या बंद झाल्या,
बा ला आला ॲटॅक
भावांत उभी राहिली भिंत,
घराला आला ॲटॅक...

ॲन्जीओग्राफीनंतर स्टेंट लावण्यास,
बा ला जीवन देण्यासाठी
डॉक्टरांनी पूर्ण विज्ञान पणाला लावले...

तिखट-गोड तळलेलं खाणं
डॉक्टरांनी सर्वच बंद केलं,
घर हे सर्व बघत राहिलं
मग त्यांचे डोळे उघडले...

तिखट शब्दांनंतर कडवे कटाक्ष टाळण्यास
जीवनाच्या डॉक्टरांना कुणी समजवू शकला तर,
उभ्या राहिलेल्या भिंती घराला वाचवू शकतात...

**– अंकुर माळी**
**(सहायक संचालक, माहिती संचालनालय, गुजरात राज्य)**

## माझं जगणं

माझं जगणं असं असावं
इतरांना ताकत देणारं
त्यांचं मन उल्हासित करणारं
त्यांच्या ओठांवर हसू आणणारं
त्यांचं आणि माझं अस्तित्व
एकच असणारं

माझं जगणं असं असावं
सर्वांना उमेद देणारं
सर्वांना आपलंसं वाटणारं
सर्वांना सामावून घेणारं
सर्वांना मुक्त करणारं



माझं जगणं असं असावं
पंचतत्वात विलीन होणारं
विश्वाचं सौंदर्य वाढवणारं
विश्व व माझं प्रतिबिंब एकच असणारं
अवकाशाची उंची विचारांनी गाठणारं

माझ जगणं असं असावं
कायम अस्तित्व ठेवणारं
अस्तित्वामधून माणसांना
जगण्याचं बळ देणारं
आनंदाचा सागर असणारं सौंदर्याचं भांडार असणारं

माझ जगणं असं असावं
विश्वाला शांती देणारं
जीवनाला अर्थ देण्याचा पाया असणारं
नवीन विश्वनिर्मितीचा ध्यास असणारं
मज्जाच मज्जाचा दरवाजा असणारं...
माझं जगणं असं असावं
अनंताकडे घेऊन जाणारं......

**– डॉ. नामदेव भोसले**
**(सह सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय)**

## तूच देव्हारा...

तूच देव्हारा गाभारा अस्तित्वाचा तू किनारा।
विस्तार तू अनंताचा आणि केंद्रीचा पुकारा।।

तुजठायी चिरंतन तेवे प्रीतीची निजखूण।
म्हणी सगुण निर्गुण प्रगटे न शब्दांतून।।

तुझ्या कारणे स्मरणे झडे काजळी वैगुण।
देई स्वैव केवलपण दुनियादारी निरसून।।

विरे शब्द अक्षरविश्व विरे लौकिकाची धारा।
होई गारा एकजीव लोपे जीवाचा पसारा।।

**अंजली ढमाळ**
**उपआयुक्त, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.**

## प्रिय आईस....



निळ्या अंबरी लपलेले
दुःख मम उफाळते
घरी सुखात मी माते
परी तुझी आठवण येते ।।१।।

चंदनापरी कष्टविले,
तव-देहास तू माते
बहरूनी लतापुष्पे,
आम्ही उभे जगामध्ये ।।२।।

सुख-दुःखाच्या क्षणाला
तुच झेलले धैर्याने
आम्हीं अजाण तेव्हा गे
नाही तुज जाणियले ।।३।।

त्यागमयी जीवन तुझे
नंदादीपाच्या ज्योतीचे
दिलीस गे दिव्यप्रभा
जीवन मम उजळले ।।४।।

**सौ. शैलजा विजय सकपाळ**
**(निवृत्त मुख्याध्यापिका)**


# कृत्रिम बुद्धिमत्ता व औषधे

**डॉ. प्रकाश कोंडेकर**

AI हा सध्याच्या घडीचा प्रचलित शब्द झालाय. (Artificial Intelligence) कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर विविध क्षेत्रात होत आहे. या तंत्रज्ञानाचा रोरोन विझ हा जनक मानला जातो.

AI आणि ML (Machine learning) चा वापर विदा (Data) विश्लेषणपासून अंदाज बांधणे, आभासी वास्तविकता (Virtual Reality), संगणक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणत आहे.

जेफ्री हिंटन यांनी एआयच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. AI प्रणाली कल्पनेपेक्षा अधिक हुशार असू शकते.



ज्यामुळे मशिन्स भविष्यात नियंत्रण घेऊ शकतात, असे त्यांना वाटते. ते असे म्हणतात की, ही प्रणाली अनुभवावर आधारित निर्णय घेऊ शकते. सध्या AI प्रणालीला स्वजागृतता नसली तरी भविष्यात अशी जागृतता विकसित करू शकेल, असे जेफ्री हिंटन यांचे निरीक्षण आहे.

विविध क्षेत्रात AI प्रणाली काम करत असली तरी औषध क्षेत्रात त्याचा परिणाम काय होईल, हे पाहणे मनोरंजक ठरेल. विविध तपासण्या, वैयक्तिक औषधे, औषध विकसित करणे, भविष्यसूचक विश्लेषण अशा विविध कामात या प्रणालीचा वापर होतो. उदा. ML (Machine learning) प्रणालीने वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण करता येते. ज्यामुळे कर्करोगासारख्या आजाराचे निदान लवकर करता येईल. तसेच AI आणि ML प्रणाली पारंपरिक औषध पद्धतीमध्ये परिणामकारक बदल घडवून अचूक औषध पद्धती विकसित करू शकेल, मानवी क्षमतेच्या पलीकडील प्रचंड विदाचे (Data) सहजपणे विश्लेषण करू शकेल.

पारंपरिक औषधनिर्मिती पद्धती विविध चाचण्यांवर आधारित, दीर्घकालीन तसेच खर्चिक आहे. AI प्रणालीची विशेषतः सखोल शिक्षण पद्धती, रेणूची कार्य पद्धती अचूकपणे जाणू शकेल. एवढेच नाही तर रासायनिक, जैवतंत्रज्ञान विदा (Data) चे विश्लेषण करून ही प्रक्रिया अधिक वेगवान करू शकेल,

औषधांचा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी, उपचाराची परिणामकता वाढवण्यासाठी, अचूक प्रभावी उपचार पद्धतीसाठी AI आणि ML महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

ही प्रणाली व्यक्तीनिहाय आरोग्य जीवन पद्धती, इतर बदल विचारात घेऊन वैयक्तिक औषधपद्धती विकसित करू शकेल. तसेच औषधाला भिन्न रुग्ण कसा प्रतिसाद देतील यांचा अंदाज घेऊ शकेल.

AI आणि ML जगण्याच्या, कामाच्या पद्धतीमध्ये क्रांतिकारक बदल घडवत आहे. जैविक आणि रासायनिक परस्पर संबंधाच्या विदाचे (Data) विश्लेषण करून औषध किती प्रभावी ठरू शकेल, याचा अंदाज या प्रणाली करू शकतात. यामुळे संशोधनाचा वेळ, खर्च तर वाचेलच; तसेच दीर्घ शारीरिक चाचण्यांची आवश्यकता भासणार नाही. AI औषध प्रक्रियेतल्या नेहमीच्या (Routine) चाचण्या स्वयंचलित करू शकेल. जसे की विदा (data) विश्लेषण, अहवाल तयार करणे.

बी. एम. वैटसन ही आरोग्याशी संबंधित एक प्रचलित AI प्रणाली कॅन्सर रुग्णाच्या उपचार पद्धतीमध्ये वापरली जाते. ही प्रणाली विदाचे विश्लेषण करून रुग्णाच्या उपचार पद्धतीची शिफारस करू शकते. अशा प्रकारे AI प्रणाली विविध क्षेत्रासह औषध क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवत आहे.

**(लेखक हे फेलो, रॉयल सोसायटी ऑफ हेल्थ लंडन व भारतीय लोक प्रशासन संस्था मंत्रालय, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे कार्यकारिणी सदस्य आहेत.)**

**कायापालट पथकाच्या माध्यमातून एकलव्य निवासी आश्रमशाळेची पाहणी करण्यासाठी गेलो असताना वर्गावर जाताना भिंतीवरील दलाई लामा यांचे 'दुसऱ्यांना आनंद मिळावा म्हणून माझ्याकडून काही मदत होतेय काय, असा प्रश्न स्वतःलाच विचारा' हे वाक्य वाचून स्तब्ध झालो. खरंच आपल्या वागण्यातून दुसऱ्यांना आनंद होतो आहे काय? शासकीय कामकाजाचा हा दौरा. मात्र इथे पाहतो तर धास्तावलेली यंत्रणा, धास्तावलेले गुरुजन आणि धास्तावलेले विद्यार्थीसुद्धा. तेव्हा ठरवले इथली धास्ती घालवायची आणि आनंद निर्माण करायचा.**

# क्षण हसरे झाले...

**किरण शार्दुल**

आदिवासी विभागाच्या कायापालट पथकासह ३० नोव्हेंबर २०१८ रोजी नाशिक, पेठरोड येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आश्रमशाळेत प्रवेश केला. सुरुवातीस प्राचार्य श्री. देवरे यांची भेट घेऊन शासनाच्या उद्देशाची, माझ्या पथकाची माहिती त्यांना अवगत करून दिली. पथकातील इतर सदस्यांना त्यांना वाटून देण्यात आलेल्या कामकाजानुसार विविध बाबींची पाहणी, तपासणी व नोंदी घेण्यास सुरुवात केली.

### धास्तावलेले वातावरण

पथकप्रमुख म्हणून मला थोडी वेगळी भूमिका पार पाडावयाची होती. प्राचार्यांच्या अनुमतीने मी वेगवेगळे वर्ग विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतच पाहण्याचे ठरवले. प्राचार्य कायापालट पथकातील इतर सदस्यांसोबत होते. मी आपल्या मोहिमेवर निघालो. प्राचार्यांच्या केबिनमधून बाहेर पडताच तळमजल्यावरील वेगवेगळ्या इयत्तांच्या वर्गामध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधून काही टिपण घेत होतो. त्यानंतर प्राचार्यांच्या कक्षाच्या शेजारून पहिल्या मजल्यावरील नववी ते बारावीच्या वर्गाची पाहणी करण्यासाठी जात होतो, तोच भिंतीवरील दलाई लामांचे 'दुसऱ्यांना आनंद मिळावा म्हणून माझ्याकडून काही मदत होतेय काय, असा प्रश्न स्वतःलाच विचारा' वाक्य वाचून स्तब्ध झालो. खरंच आपल्या वागण्यातून दुसऱ्यांना आनंद होतो आहे काय? शासकीय कामकाजाचा दौरा-इथे पाहतो, तर धास्तावलेली यंत्रणा, धास्तावलेले गुरुजन आणि धास्तावलेले विद्यार्थीसुद्धा. ठरले तर, धास्ती घालवून आनंद निर्माण करायचा.

### सर्व वर्गाने केला जल्लोष

आनंद निर्माण करण्याच्या विचारातच वर्गात प्रवेश केला, कोणत्या इयत्तेचा वर्ग होता नक्की आठवत नाही. गुड आफ्टरनून सर, सिट डाऊन वगैरे झाले. वर्गावर कोणीही शिकवत नव्हते. तथापि, अधिकारी येणार, आपल्याला प्रश्न विचारणार या विचाराने विद्यार्थी धास्तावलेले. कोणाचा तास आहे? असे विचारले असता, प्राचार्यांचा तास असल्याचे समजले. प्राचार्य तर आमच्या पथकातील इतर सदस्यांसमवेत होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कोणत्या विषयाचा तास आहे? अशी विचारणा केली असता डब्ल्यू.ई.चा असे सांगण्यात आले. वर्क एक्सपिरिअन्स (डब्ल्यू. ई.) मनाशीच वाटले



उडाली आता आपलीच दांडी. पण हार मानून चालणार नव्हते. विद्यार्थ्यांना बोलते करायचे होते. त्यांची भीती घालवून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करावयाचा होता. विचारले सरांनी काय शिकवले? मुले अबोल. कोणाला काही कला, लिखाण, वाचन, गायन, नकला वा काही विशेष आवड आहे काय? तरीही विद्यार्थी आपले अबोलच. शेवटी युक्तीचा वापर केला. विचारले कागदाच्या वस्तू कोणाकोणाला बनवता येतात? आणि काय चमत्कार! सर्व वर्गाने जल्लोष केला, त्यांना काय काय येते ते सांगू लागले.

### मुले लागली कामाला

चला वर्ग तर आता बोलता झाला होता. सर्व विद्यार्थ्यांना त्यांना येत असलेल्या कागदी वस्तू बनवण्यास सांगतो न सांगतो तर काय आश्चर्य! चांगल्या वह्यांची पाने टराटरा फाडलीसुद्धा गेली होती. 'अरे रफ कागद वापरा,' ही माझी सूचना त्यांनी केव्हाच दुर्लक्षित केली होती. तशाही अवस्थेत एक विद्यार्थिनी उठून उभी राहिली व ओशाळून बोलली, 'सर मला काहीच येत नाही; पण मला शिकायला आवडेल..' तिला सांगितले, 'काहीही काळजी करू नको. मी तुला शिकवेन.' तोपर्यंत इतर विद्यार्थी कागदी वस्तू बनवण्यात दंग झाले होते. विविध कागदी; परंतु नावीन्यपूर्ण वस्तू जीव ओतून तयार केल्या जात होत्या. विविध प्रकारच्या होड्या,

आकाशकंदील, पाट्या, फुले, माळा, टोपल्या, सुपे, वेण्या, गजरे, चेंडू, विमाने, बाहुल्या, हेलिकॉप्टर्स, जोकर, वगैरे वगैरे.

मुलांच्या वस्तू तयार झाल्या होत्या. आता त्यांनी तयार केलेल्या वस्तूंवर त्यांची नावे लिहायला सांगून सर्व वस्तू माझ्या पुढ्यात आणून ठेवण्यास सांगितले. पुढ्यात आलेल्या वस्तूंमधील एक-एक वस्तू उचलून त्यावरील नाव वाचून ती वस्तू कोणत्या विद्यार्थी/विद्यार्थिनीची आहे याची माहिती घेत होतो. तसेच त्याने तयार केलेली वस्तू सर्व वर्गाला दाखवून वर्गातील इतर विद्यार्थ्यांकडून टाळ्या वाजवून शाबासकी मिळवून देत होतो. विविध प्रकारच्या वस्तू दाखवून झाल्या. त्यानंतर एका विद्यार्थ्यांने तर अत्यंत कुशलतेने लढाऊ विमान तयार केले होते. दुसऱ्या एकाने छोटीशी रायफल बंदूक तयार केली होती. सहज विचारले, 'सीआयडी मालिका पाहतोस काय', तर त्यालाही दयासारखे, शिवाजी साटम यांच्यासारखे सीआयडी ऑफिसर बनायचे असल्याचे लक्षात आले.



### उत्तर मिळाले

सर्वांनी तयार केलेल्या वस्तू दाखवून सर्वांचा गौरव समारंभ पार पडला होता. सर मला काहीच येत नाही, पण मला आवडेल शिकायला असं म्हणणारी मुलगी उभी राहिली. तिला पुढे बोलावले. एक कागद माझ्याकडे ठेवला. त्याच्या तीन समान पट्ट्या कापल्या. त्याप्रमाणे तिच्याकडे असलेल्या दुसऱ्या कागदाच्या तीन समान पट्ट्या कापण्यास तिला सांगितले. त्यानंतर माझ्याकडच्या त्या पट्ट्या मध्यभागी दुमडल्या,

त्याप्रमाणे तिलाही त्या कागदी पट्ट्या मध्यभागी दुमडण्यास सांगितले. त्यानंतर माझ्याकडे असलेल्या तीनही पट्ट्या एकमेकांमध्ये योग्य प्रकारे गुंफल्या व त्याप्रमाणेच तिलाही तिच्याकडच्या पट्ट्या गुंफण्यास सांगितले. पट्ट्या समान दाबाने खेचताच एक शंखाकृती पट्ट्यांची टोपली तयार झाली होती. हीच टोपली तिला उलटी करून पेन/पेन्सिलच्या टोकावर धरायला लावली. त्याप्रमाणे ती तिने पेनाच्या टोकावर ती उलटी केलेली पट्ट्यांची टोपली ठेवली. वरतून असलेली पंख्याची हवा. त्यामुळे ती एका चक्रासारखी आपोआपच फिरायला लागली तशी ती मुलगीही आनंदी झाली. सर्व मुले आनंदाने टाळ्या वाजवायला लागली. सर्व मुलांना आपआपल्या वस्तू घेऊन जाण्यास सांगितले. आलेला माणूस आपल्यातीलच एक आहे असे समजून सर्वजण हस्तांदोलन करून भयमुक्त होऊन वर्गाच्या बाहेर पडत होते. आपल्या वस्तू उंचावत, विद्यार्थी विमाने उडवत, विद्यार्थिनी कागदी गजरे लावत आणि ती विद्यार्थिनी जिला काही येत नव्हते, ती कागदी भिंगरी फिरवत.

तास केव्हाच संपला होता. मध्यांतरची बेल होऊनही मुले जेवायला का आली नाहीत? हे पाहण्यासाठी प्राचार्य वर्गाजवळ आले. माझी कामगिरी नुकतीच संपली होती. धास्तावलेल्या वातावरणातून विद्यार्थ्यांसह सर्वांचीच सुटका झाली होती. आनंदी वातावरणाची निर्मिती वर्गात आणि शाळेत झाली होती. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता, प्राचार्य सुखावले होते, तर मला दलाई लामांच्या वाक्याचे उत्तर सापडल्याचे समाधान मिळाले होते.

### आनंदी वातावरणाची निर्मिती

मुलींनी विविध प्रकारच्या टोपल्या, धान्य पाखडण्याचे सूप, फुले, माळा, गजरे, वेण्या बनवल्याचे आढळून आले. या वस्तू त्यांनी अगदी सहजच बनवल्या होत्या. त्यांनी बनवलेल्या वैविध्यपूर्ण वस्तूंनी मला तर एक वेगळे आश्चर्यमिश्रित समाधान मिळवून दिले होते. त्यांच्याही वस्तू नावे पुकारून सर्व वर्गाला दाखवून त्यांचेही कौतुक करून घेतले. त्यानंतर एका मुलीने तर कमालच केली. तिने सत्कार समारंभाप्रसंगी जसे गुलाबाचा पुष्पगुच्छ दिला जातो, त्याप्रमाणे कागदी फुलांचा पुष्पगुच्छ तयार करून मला मोठ्या आनंदाने दिला. एकूणच मुले आनंदी झाली होती.

आपलं मंत्रालय, जानेवारी २०१९ मधून पुनर्मुद्रित

**भारत हा जैवविविधतेने नटलेला देश असून, इथे निसर्गाचा अद्वितीय खजिना आहे. त्यामध्ये खंड्या पक्षी (Kingfisher) हे आपल्या तेजस्वी रंगसंगतीमुळे आणि जलाशयाच्या सान्निध्यात राहण्याच्या सवयीमुळे अत्यंत आकर्षक ठरतात. माझ्या छायाचित्रण सफरीत भारतातील १२ किंगफिशर पक्षी टिपण्याचा दुर्मीळ योग आला.**

# मनमोहक खंड्या पक्षी







**दुर्गा प्रसाद मैलावरम**

**छोटा खंड्या (Small Blue Kingfisher) – नवी मुंबई**

एक लहानसा, आकर्षक निळसर रंगाचा पक्षी. सहजपणे पाण्याच्या किनारी किंवा नद्या, तलाव, ओढ्यांच्या जवळ आढळतो. जलचर कीटक आणि लहान मासे यावर उपजीविका.

**धीवर पक्षी (White-throated Kingfisher) – रायगड**

तपकिरी पंख, निळसर शरीर आणि पांढऱ्या छातीसह सहज ओळखता येतो. मासे, सरडे, छोटे उंदीर आणि कीटक खातो. शहरी आणि ग्रामीण भागातही सहज आढळतो.

**कवडा खंड्या (Pied Kingfisher) – नागपूर**

काळ्या-पांढऱ्या पट्टेरी पिसांसह अतिशय सुंदर आणि वेगळा प्रकार. पाण्यावर थांबून किंवा हवेतून झेप घेत मासे पकडणारा पक्षी. जलाशय, तळी आणि नद्यांमध्ये सहज आढळतो.

**मलबारी खंड्या (Collared Kingfisher) – अंदमान**

निळसर हिरवा आणि पांढऱ्या रंगाच्या पिसांसह मध्यम आकाराचा पक्षी. मुख्यतः खाऱ्या आणि गोड्या पाण्याच्या मिश्र भागात आढळतो.

**काळ्या डोक्याचा खंड्या (Black-capped Kingfisher) – सुंदरबन**

डोक्यावर काळसर टोपी, निळसर पंख आणि लाल चोच असलेला सुंदर पक्षी. मोठ्या नद्या आणि खाडी प्रदेशात आढळतो.

**निळ-कान खंड्या (Blue-eared Kingfisher) – चिपळूण, रत्नागिरी**

अतिशय चमकदार निळ्या रंगाचा, छोट्या आकाराचा पक्षी. जलचर कीटक आणि लहान मासे खातो.

**घोंगी खंड्या/बलाकचोच धीवर (Stork-billed Kingfisher) – पन्ना व्याघ्र प्रकल्प, मध्यप्रदेश**

मोठ्या लालसर चोचेसह अतिशय भव्य आणि सुंदर पक्षी. मोठ्या नद्यांच्या किनारी आणि खाऱ्या पाण्यातही आढळतो.

**ब्राऊन-विंग्ड किंगफिशर (Brown-winged Kingfisher) – भितरकनिका, ओडिशा**

तपकिरी रंगाचे पंख आणि निळसर शरीर असलेला दुर्मीळ पक्षी. मुख्यतः खाऱ्या पाण्याच्या दलदलीत आढळतो.



















**तिंबोटी खंड्या (Oriental Dwarf Kingfisher) – कर्नाळा पक्षी अभयारण्य**

सर्वात छोट्या आकाराचा, रंगीबेरंगी आणि वेगाने हालचाल करणारा किंगफिशर. पावसाळ्यामध्ये विणीच्या हंगामामध्ये हा पक्षी महाराष्ट्रात कोकण किनारपट्टी भागात येतो. पावसाळ्यात सक्रिय असलेला आणि जंगलाच्या दाट भागात आढळतो.

**क्रेस्टेड किंगफिशर (Crested Kingfisher) – काश्मीर**

डोक्यावर शिखरासारखी पिसे असलेला मोठ्या आकाराचा किंगफिशर. भारताच्या उत्तरेकडील हिमालय पर्वतीय नद्यांमध्ये मासेमारी करणारा पक्षी आहे.

**रुडी किंगफिशर (Ruddy Kingfisher) – अंदमान**

लालसर–तपकिरी रंगाचा आणि अत्यंत दुर्मीळ प्रकार. हा पक्षी मुख्यतः दाट जंगलामध्ये राहणारा आणि जलचर शिकार करणारा आहे.

**ब्लायथ्स किंगफिशर (Blyth's Kingfisher) – अरुणाचल प्रदेश**

गर्द निळसर रंगाच्या पिसांसह हा मोठ्या आकाराचा पक्षी आहे. घनदाट जंगलातील वेगाने वाहणाऱ्या ईशान्य भारताच्या पर्वतीय नद्यांच्या जवळ आढळणारा अत्यंत दुर्मीळ पक्षी आहे.

**किंगफिशर पक्ष्यांचे महत्त्व**

खंड्या (Kingfisher) पक्षी हे पर्यावरणाच्या संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावतात. ते जलचर जिवांवर उपजीविका करतात आणि परिसंस्थेतील जैवविविधतेचा एक महत्त्वाचा भाग आहेत, परंतु जंगलतोड, जलप्रदूषण आणि मानवी अतिक्रमणामुळे त्यांची संख्या कमी होत आहे.

**संरक्षणासाठी उपाय**

- नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन
- दलदलीचे आणि जंगलांचे संरक्षण.
- किंगफिशर पक्ष्यांच्या अधिवासांवर संवर्धन योजना राबवणे.
- जनजागृती आणि शिक्षणाद्वारे लोकांमध्ये पर्यावरणप्रेम निर्माण करणे.


**निष्कर्ष**

भारतामध्ये आढळणाऱ्या १२ प्रकारच्या किंगफिशर पक्ष्यांचे छायाचित्रण करताना मला निसर्गाच्या विविधतेचा अनोखा अनुभव मिळाला. हे पक्षी केवळ त्यांच्या सौंदर्यासाठीच नव्हे, तर परिसंस्थेतील संतुलनासाठीही महत्त्वाचे आहेत. त्यांचे संरक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे.

(सर्व छायाचित्रे दुर्गा प्रसाद मैलावरम)

**(लेखक अवर सचिव या पदावर कार्यरत आहेत.)**

**आत्मवादाच्या विरोधी सिद्धांत म्हणजे अनात्मवाद असे म्हणता येईल. अनात्मवादात आत्म्याचा निषेध केला आहे. भगवान बुद्ध हे अनात्मवादी होते. अनात्मवाद हाच मुळी बुद्ध दर्शनाचा पाया आहे. अनात्मवादात आत्म्याचे संपूर्णत: निराकरण केले आहे. हा वाद म्हणजे आत्म्याचा अनास्तिवाद किंवा भौतिकवाद आहे, परंतु भगवान बुद्धाने बौद्ध दर्शनात त्या अर्थाने तो स्वीकारलाच नाही, तर भगवान बुद्धाने त्याला शास्वतवाद व उच्छेदवाद या दोन एकांकिक वादाच्या मधला रस्ता मध्यमा प्रतिपद असे म्हटले आहे.**




# अनात्म–एक शोध

**डॉ. रमेश नारायण**

शाश्वतवादाचा सिद्धांत म्हणजे आत्मा हा नित्य, कूटस्थ, चिरंतन व एकरूप आहे असे मानणे; उच्छेदवाद म्हणजे आत्मा नाहीच असे मानणे. भगवान बुद्धाने आपल्या अनात्मवादात आत्म्याचे वर्णन निषेधात्मक पद्धतीने केले असले तरी भगवान बुद्धाने व्यावहारिक रूपाने आत्म्याचा निषेध केलेला नाही. तर तो पारमार्थिक रूपाने केला आहे. आत्मवादी पुरुष आत्म्याचे स्वरूप समजून न घेता त्याच्या कल्याणासाठी नाना प्रकारचे यज्ञयागादी सत्कृत्ये करीत असतो. आत्म्याचे कोणतेही गुणधर्म समजून न घेता आपल्या पारलौकिक सुखासाठी यज्ञयागादी कर्म करणे हास्यास्पद असेच म्हणता येईल. कर्मकांडात वेळ, अन्नधान्य, अर्थ व जीव हे व्यर्थ जातात. रुळलेल्या वाटेने न जाता त्या वाटेवरच त्यांची स्वतःची अशी वाट शोधतात आणि त्यांचे स्वत्व अबाधित राखतात.

आत्म्याचे अस्तित्व मानणे हेच सर्व अनर्थाचे मूळ आहे. आत्मा मानण्यानेच अहंकाराचा उदय होतो. आत्म्याला सुख मिळावे म्हणून जीव नाना प्रकारांनी शरीराला सुख देऊ पाहतो आणि त्यासाठी सुखप्राप्तीचे अनेक उपाय धुंडू लागतो. यासाठी आत्म्याचा निषेध करणे हाच कामविजयाचा सुगम मार्ग आहे. हाच धागा पकडून लीना संखे आत्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. अहंकार बाजूला ठेवून त्या त्यांचे स्वत्व जपण्याचा प्रयत्न करतात. त्यात एकरूप होण्याचा त्यांचा मानस दिसून येतो. मनाचा शोध घेण्याचाही त्या प्रयत्न करतात; पण त्यांना जाणवते की,

चिंधड्या उडाल्या तरी सापडेना
मना तुझा थर कोणता?

असा प्रश्न पडला तरीही त्या मात्र स्वतःशीच एकरूप होताना दिसतात, म्हणूनच त्या म्हणतात,

श्वासाश्वासात तुला पूजिते मी

आणि त्या एकरूपतेतच त्यांना जाणवते की,

तुझी आभा मी, तू माझी प्रतिभा,
तुझे प्रतिबिंब मी, मम आत्म्याची तू प्रतिमा

असे म्हणत म्हणत त्या आत्म्याचा शोध घेताना त्या म्हणतात.

शोधात निघालास ना
उद्या तूच नक्की कुणाला तरी
देव म्हणून दिसशील..

ध्यानात त्यांना अनुभूती होते, अन् त्या स्वतःला हरवून जातात त्या त्यांच्या राहतच नाहीत. मग त्या म्हणतात,

ठायी ठायी उतरून येणारे मी सत्व
मी ब्रह्मांड, माझ्यात उमटलेले मी शून्यत्व..

त्या ध्यानात लीन होऊन जातात. ही त्यांची आध्यात्मिक वाटचाल, असेच म्हणावे लागेल.

मग त्यांना जाण येते, आणि त्या 'जाण' या कवितेत म्हणतात,

शुद्ध स्वरूपात जाणणे नको अशुद्धाचे वावडे नको..

असे म्हणत 'पंख' या कवितेत म्हणतात.

***सुटले तर सुटू दे***
***बंधच शेवटी***
***तुटले तर तुटू दे***
***त्याचा पक्ष्याला***
***सोस कशाला ?***

अशा त्या मुक्त होऊ इच्छितात, त्यात अडकून पडणे त्यांना मान्यच नाही, म्हणूनच त्या पक्ष्याच्या पंखाशी जुळतात.

ध्यानात त्या लीन होतात, तेव्हा 'आत्म' कवितेत त्या म्हणतात,

***तुझी आभा मी, तू माझी प्रतिभा***
***तुझे प्रतिबिंब मी, मम आत्म्याची तू प्रतिमा***

त्यावेळी त्या त्यांच्या उरतच नाहीत. एकरूप होऊन जातात.

मग 'आवाज' या कवितेत त्यांना हव्या असणाऱ्या आवाजाची त्या वाट पाहत कासावीस होतात; पण त्या हार मात्र मानत नाहीत. आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर त्यांना वेगवेगळ्या अनुभूती येतात. त्या जिद्दी आहेत, त्याचबरोबर त्या सोशिक होण्यातही समाधान मानतात. तेव्हा त्या व्यक्त होतात,

***जिंकण्याची असते धडपड***
***पण ही हारही महत्त्वाची***
***प्रवास असतो अनंत***
***अन शांतता अनादि***

हा शोध घेण्याचा त्या खेळ खेळत असतानाच त्यांना मोह, भीती, आणि शांती यांना सोबत घेऊनच त्या जगत असतात. कारण त्या बौद्ध मतानुसार शाश्वतवादाच्या सिद्धांतात आत्मा नित्य, कूटस्थ चिरंतन व एकरूप आहे यावर त्यांचा दृढ विश्वास आहे आणि या शोधकार्याच्या मार्गात त्या,,

***आदिम आत्मा तू***

या मतापर्यंत त्या येऊन पोहोचतात. असे असले तरी, आत्म्याचा निषेध मात्र त्या करत नाहीत, जरी त्या अनात्मवादी असल्या तरीही.

त्यांच्या कवितेत रूप, वेदना, संस्कार, प्रेम व विज्ञान हे प्रकर्षाने डोकावताना दिसतात, कारण त्या अनात्मवादी आहेत. तसेच वाट्याला आलेले जीवन जगता जगता मैलाचा दगड पाठीमागे टाकता टाकता त्या अस्वस्थ होताना दिसतात व शेवटी निर्विकार होऊन हा प्रवास असाच सुरू ठेवण्याची त्या इच्छा व्यक्त करतात. आणि त्यांना वाटते,

***पुसून टाकावा आता पसारा अंतराचा***
***निर्विकार करावा म्हणते सारा प्रवास***
***आधीचा, नंतरचा आणि मग हळू हळू निरंतराचा..***

ही आध्यात्मिक वाटचाल त्यांच्या प्रगल्भतेची खूण आहे, असे म्हणणे उचित ठरेल.

कधी कधी त्या अधिकार हीन होतात व आपण नियतीच्या हातचे बाहुले आहोत, आपल्या हाती काहीच नाही असे त्यांना वाटायला लागते, अन् त्या 'नियती' या कवितेत म्हणतात,

***जिवंत मला सोडून इथे***
***औदार्याचा आविर्भाव किती?***
***पण जगण्याचा सांग खरे***
***दिलास तू अधिकार किती?***

हे वास्तव त्या मांडतात, आणि मान्यही करतात.

पुढे 'प्रवास' या कवितेत त्यांना या प्रवासात शोध मोक्ष हे सारं व्यर्थ वाटायला लागतं.

शोध, मोक्ष, सार अन् अर्थ सारं खरं अन् सारं व्यर्थ

त्यांना या प्रवासात यात्रेकरू बनून 'यात्री' या कवितेत वेदना व्यक्त करण्याची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नाही. मी कायम इथली यात्रेकरू नाही याची त्यांना जाणीव होते म्हणून त्या हताश होतात अन् म्हणतात,

***फिर्याद जी मी केली***
***नाकारण्यात आली,***
***हात दावूनी वरूनी***
***सारी माणसे म्हणाली***
***देणारा भगवंत आहे.***
***येथला न मामला हा***
***तेथला न मी निवासी,***
***बोलू तरी कुणाशी***
***आयुष्य असेल थोडे***
***पण क्षण दिगंत आहे..***

त्या ऋणात त्यांना अनंत वेदना जाणवतात; पण त्याची त्यांना कोणाकडे साधी दादही मागता येत नाही. कारण तो देणारा तर भगवंतच आहे आणि ज्याच्याकडून सुखाची अपेक्षा करावी तोच जर वेदना देत असेल तर काय करावं? पण या जगात मी कायमची निवासी नाही याची मात्र त्यांना पूर्ण जाणीव आहे. पण हे आयुष्य थोडे असले तरी त्यातील क्षण मात्र दिगंत आहेत आणि यातच त्या समाधान मानतात, परंतु वाट्याला आलेले आयुष्य मात्र बिनतक्रार जगायलाच हवे, ही त्यांची जिद्द आहे. म्हणूनच त्या 'अधांतर' या कवितेत म्हणतात.

***किनारा मिळो न मिळो***

जिवंत आहे तोपर्यंत पाण्यावर तरंगतच राहायला हवं,

असा त्या निर्धार करतात. कारण त्यांना काळाच्या कसोटीवर

उतरायचं आहे. हा शोध घेत असताना 'निरर्थ' या कवितेत त्यांना त्या पाण्यावर केवळ कलेवर तरंगताना दिसत आहे, तेव्हा हे कलेवर सोडून आत्मा एकटाच बुडाला का? असा प्रश्न त्यांना पडतो. शेवटी आत्मा एकटाच असतो, या वस्तुस्थितीचे त्यांना भान आहे आणि अंतिमाचा त्यांनाही ध्यास असावा असे त्यांना वाटते. हा शोधाशोध करता करता 'प्रश्न चिन्ह' या कवितेत त्यांना असे वाटते की, अनेक प्रश्न त्यांच्याकडे धावतच येत असतात; पण त्यांना उत्तरे मात्र मिळत नाहीत, मग ते प्रश्नच कंटाळतात, अन शांत होऊन ते मौनात जातात. मग त्या मौनात त्या उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात आणि अनात्मवाद हा वस्तुतः मौनवाद आहे. याचबाबत एकदा भगवान बुद्धाला पुढील प्रश्न विचारले गेले होते.

१. जीव शरीराहून भिन्न आहे की, अभिन्न आहे?

२. तथागत बुद्ध मृत्यूनंतर आत्मा राहतो किंवा नाही?

३. का नाही राहत आहे का नाही न राहत आहे?

भगवान बुद्धाने या सर्व प्रश्नांची उत्तरे मौनात दिली होती. भगवान बुद्धाच्या या मौनाचा खरा अर्थ शोधण्यासाठी अनेक बौद्ध व बौद्धतर पंडितांनी आपापली मते मांडली होती. त्याचा मागोवा घेण्याचा व जणू काही वाट पुसण्याचा प्रयत्न येथे कवयित्री करताना दिसतात. त्याचबरोबर त्या विकल्पसुद्धा शोधण्याचा प्रयत्न करतात; पण विकल्प मात्र त्यांना लगेच गवसत नाही. मग त्या 'विकल्प' कवितेत म्हणतात की,

***निर्धास्त, निर्धार असं काहीच***
***नसताना कुणी मागे का उरावं?***

असा प्रश्न त्यांना पडतो. पण तो प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहतो.

'फासे' या कवितेत नियतीने टाकलेले सारेच फासे त्यांना ओळखीचे वाटतात, सारे काही आधीच ठरलेले असते. ढग पावसाच्या सरी घेऊन येतात; पण आतला उन्हाळा मात्र जाता जात नाही, तो तसाच राहतो, त्याचे काय करायचे? हा प्रश्न त्यांना पडतो.

***ढग येतात दाटून***
***सरी जातात वाटून***
***जातच नाही तरी आतला उन्हाळा***

आणि या फास्यातच आपण अडकल्याची जाणीवही त्यांना होते. हे जीवनाचे रहस्य उलगडण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत, असे दिसते.

आता कुठले स्वप्नच नको असे त्यांना वाटायला लागते. आता काही उरलेच नाही असे वाटून त्या निरिच्छ होतात. मग 'पाचोळा' या कवितेत त्या व्यक्त होतात, पाहिलेली सारी स्वप्न त्यांना आता नकोशी वाटतात. मग त्या म्हणतात,

***पुरे स्वप्नांचा मळा आता***
***इच्छांचा हवं तर पाचोळा होऊ देत...***

या विचारांपर्यंत त्या येऊन पोहोचतात, कारण आता कशातच राम उरत नाही याचीही त्यांना जाणीव होते. अगदी निर्वाणीचं त्या नकळत बोलून जातात.

आपल्या वाट्याला आलेले जीवन जगत असताना नुसता आटापिटा होतो, त्या अस्वस्थ होतात, हताश होतात, त्या घुटमळतात, कासावीस होतात, कावरेबावरे होतात; पण हाती मात्र काही सापडतच नाही आणि आपल्या हाती काहीच लागले नाही याची जाणीव त्यांना होते. अंतराचा शोध घेता घेता त्या मोहात केव्हा अडकून पडतात, याचे त्यांना भानच राहत नाही. आयुष्यभर त्या धडपडत, शोधतच राहतात केवळ त्या म्हणतात,

***आत आतल्या आत कुरतडत असतं काही***
***जाणवतं, पण जे सापडत बिलकुल नाही***
***जीव कासावीस आणि कावरा बावरा***
***पुढे त्या म्हणतात,***
***आतिथ्यापलीकडची कुठलीच ओळख***
***त्याची कुणाशीही पटत नाही..***
***तोपर्यंत आपलं वाटलेलं जग***
***त्याला आपलंसंच वाटत नाही..***

अशी वेळ येते की, कुणी आपले असे आपल्याला जाणवतच नाही, असे त्यांना वाटायला लागते, मग मी उगाचच या शोधासाठी धडपडत राहिले असा त्यांना प्रश्न पडतो. अन् निराशा पदरी पडते.

शेवटी 'भोवरा' या कवितेत भोवऱ्यासारखी स्वतः भोवतीच आयुष्यभर गरगर फिरत असल्याची त्यांना जाणीव होते. कधी सुख, तर कधी दुःख असे स्वतःभोवतीच गरगर धावत राहिल्यामुळे नव्याने हाती काहीही लागल्याची जाणीवच झाली नाही. हे सर्व घडते ते स्वतःभोवती गरगर फिरल्यामुळेच हे मात्र प्रकर्षाने जाणवले, त्या अवस्थेत त्यांना

***झाकोळते कधी, कधी लख्ख प्रकाश सामोरा***
***आवरू कसा सांग मी क्षणाक्षणाचा पसारा?***

असा प्रश्न त्यांना पडतो; पण आलेला उमाळा त्यांना आवरेनासा होतो तेव्हा 'जोखड' या कवितेत व्यक्त होताना त्या म्हणतात,

***कोणत्या वेळेची वाट पाहत***
***या संभाळाव्या वेळा***
***किती वेळ बसावे इथे कुढत***
***आवर्त अविरत उमाळा...***

'पसारा' या कवितेत निसर्गाचा पसारा त्यांना सदैव पसरलेला दिसतो. आणि त्या पसाऱ्यात त्या स्वतःला शोधण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्या म्हणतात,

***शेवटी एकट्याचाच प्रवास***
***तरी खरं सांग काय खरं असतं?***
***एकट्यानेच मिळते ना मुक्ती***
***मग उरावर कसला भार असतो?***
***सोबत असून सोबत शोधण्याचा***
***हा कसला वेडा निर्धार असतो?***

येथे तर जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी सगळीकडे निसर्गचाच पसारा. हा निसर्ग सताड उघडा विस्तीर्ण सगळीकडे पसरलेला दिसतो. खरे तर हे सारे त्या एका अंशातच म्हणजे शून्यातच सामावले आहे. त्या पलीकडे काहीही नाही. हा सारा फापटपसारा त्या एकट्याचाच आहे आणि तोच यात सामावला आहे, शोध घेता घेता त्यांना हे जाणवले.

जन्माला आल्यानंतर या आयुष्यात अडकून पडावेच लागते. त्या शिवाय अन्य पर्याय नाही. त्यासाठी त्या म्हणतात की,

***पण कधीतरी ठरवावं लागेलच ना***
***हवंय काय? नुसती सुटका की मुक्ती?***

या आयुष्यात अडकून पडल्यामुळे त्यातून बाहेर पडण्याचा, त्यातून सुटण्याचा म्हणजेच मुक्तीचा मार्ग शोधण्याचा त्या प्रयत्न करतात. जखडून पडलेल्या आयुष्याला मनमोकळेपणाने; तसेच स्वैरपणाने बागडू द्यावे.

असे वाटणे साहजिकच आहे आणि यातून सुटका व्हावी, मुक्ती मिळावी असेच त्यांना वाटल्यानेच, यातून त्या अंतर्मुख झाल्याचे लक्षात येते आणि यातूनच त्या आयुष्याचे गमक शोधण्याचा प्रयत्न करतात.

’निर्भय’ या कवितेत त्या म्हणतात,

***मोकळीच ठेवली खिडकी***
***अन् दारही आता सताड उघडे***
***भय इथले संपत आहे***
***वाहू दे वारे वाकडेतिकडे***

या आयुष्यात निर्भय होऊन जगण्याची त्यांची इच्छा आहे, कुठल्याही बंधनात न अडकता सर्वत्र वावरण्याची त्या इच्छा व्यक्त करतात, येथली सारी बंधने त्या निर्भयपणे झुगारण्याचे धाडसही करतात.

भगवान बुद्धाच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसतो आणि आत्मा आहे असे मानण्यानेच अहंकाराचा उदय होतो. या विचारांशी त्या सहमत आहेत, असे त्यांच्या व्यक्त होण्यातून जाणवते आणि त्या आत्म्याला सुख मिळावे म्हणून हा जीव नाना प्रकारांनी या शरीराला सुख देऊ पाहतो. मग त्या सुखप्राप्तीचे अनेक उपाय तो धुंडू लागतो. म्हणूनच आत्म्याचा निषेध करणे हाच कामजीवनाचा सुगम मार्ग आहे याची त्यांना जाणीव झाली आहे. हाच तर भगवान बुद्धाचा अनात्मवाद आहे. जो त्यांच्या पचनी पडलाय. म्हणूनच त्या म्हणतात,

आत्मा ही काही वस्तू नाही. तो तर नित्यनूतन आहे, तसेच तो परिवर्तनशील आहे. विज्ञानवादी व योगाचारी यांच्या मते आत्मा हा विज्ञान आहे फक्त. भगवान बुद्धाची शिकवणच मुळी शून्यात जाण्याची आहे. विपश्यनेत गेल्यावर आपल्या मनातील सर्व विचार, सर्व भावना नष्ट होतात. आनंद, भीती, हुरहूर, राग, द्वेष, मत्सर, यापैकी काहीही उरत नाही. त्याचप्रमाणे आधीचे म्हणजे भूतकाळाचे काहीही नसते, त्याचप्रमाणे भविष्याच्या बाबतीतही काहीही विचार मनात येत नाहीत, असतो तो केवळ अन् केवळ फक्त वर्तमान. तीच तर शून्यावस्था असते. ना आनंद ना दुःख अशा त्या अवस्थेलाच भगवान बुद्ध शांती असे म्हणतात.

***मी त्याच्यात शून्य होऊन जाते,***
***तुझ्या इतकीच माझ्यात वावरते,***
***स्वतःशी होऊन स्वतः:’ अनोळखी,***
***अन् अनुभवते तुझी बुद्ध शांती***

असे म्हणून त्या बुद्धमय होऊन जातात, त्यांच्यात एकरूप होऊन जातात. विपश्यनेत अशीही अनुभूती त्यांना येते.

शोध घेण्याचे काहूर त्यांच्या मनात उठते, आणि ते शोधण्यासाठीच त्यांना पाऊल हवे असे त्या ’पाऊल’या कवितेत म्हणतात,

***शोधाचे काहूर हवे***
***पडणारे पाऊल हवे...***

आयुष्याची वाट चालताना ती वाट असंख्य खाचखळग्यातून जात असते, याची त्यांना जाणीव आहे. त्या वाटेच्या शोधात त्यांची पावले

***धुळीत चिखलात***
***उजेड काळोखात***
***काट्याकुट्यांत***
***झाडाझुडपांत***
***पाऊसवाऱ्यांत***
***दऱ्याखोऱ्यांत***

जाताना त्यागाच्या, जिद्दीच्या वाटेचीच त्यांची पावले वाट शोधत असतात.

’भूमिका’ या कवितेत त्या सांगतात, आयुष्यातली त्यांच्या वाट्याला आलेली भूमिका वठवताना त्यांना काळोख हवा, कारण आकाशातले तारे त्यांना बघायचे आहेत अन् ते तर काळोखातच चमकू शकतात, त्यांना आकाशात उंच अशी भरारी मारायची आहे, पण त्यासाठी त्यांना पंख हवेत, आनंद कळण्यासाठी पाऊस पडायला हवा, सारे काही हिरवेगार होण्यासाठी, तो हिरवा रंगच आनंदाचे, समृद्धीचे प्रतीक आहे. त्यातच त्यांना सामावून जायचे आहे. त्यालाच सर्वस्व अर्पण करावयाचे आहे. म्हणून त्या म्हणतात,

***हे जग तुझे***
***तू माझे जग***
***तुझे तू दे मला***
***अथवा सारे माग***

समर्पणाची भावना त्या येथे व्यक्त करतात.

त्यांना झाडाच्या आश्रयाशीच राहायचे आहे. त्याच्याशीच त्यांना जवळीक साधावयाची आहे. त्याच्या सुख दुःखात त्यांना सामील व्हायचे आहे. त्याच्यात सामावून जायचे आहे. हीच अतीव तीव्रता त्यांच्यात दिसून येत आहे. म्हणूनच त्या म्हणतात,

***आणि आता तिला लक्षात आलंय की,***
***या या झाडापाशी राहायचंय***
***आयुष्यात येणाऱ्या साऱ्या सुख दुःखाचे***
***त्यांना साक्षीदार व्हायचे आहे.***

‘क्षण’ या कवितेत कमी शब्दात मोठा आशय, हे म्हणणे उचित ठरेल.

***एक***
***क्षण***
***होता***
***क्षणासारखा***
***क्षणात***
***गेला***
***इतकंच...***

आयुष्यात आलेला प्रत्येक क्षण हा नदीच्या वाहत्या पाण्यासारखा असतो, आता आलेला क्षण पुन्हा कधीही येत नाही. तो एकदाच येतो तर त्याचा सद्उपयोग करून जीवन सार्थक होते,

यावर त्यांचा विश्वास दिसतो. म्हणूनच आयुष्यात त्यांना मिळालेल्या क्षणांचा त्या अनुभव घेतात आणि आयुष्यभर तो क्षण जपण्याचा त्या प्रयत्न करतात, आयुष्यात त्या तडजोड करतात, म्हणून त्या 'खंत' या कवितेत म्हणतात,

***कुणीच आपलं नाही,***
***अस वाटलं कितीही***
***तरी बोलावंसं वाटतंच ना...***

पुढे त्या म्हणतात, स्वप्न पडू नये असे वाटत असले तरी ते बघण्यासाठी निजावंसं वाटतं. काय आपलं म्हणावं हा प्रश्नच पडतो, खरं पाहिलं तर आपलं काहीच नाही. आपले शरीर तरी कुठे आपले आहे? पण ते शरीर आपल्याला सांभाळावंच वाटतं ना. श्वास सुरू आहे, तोपर्यंत जगावंच लागणार आहे, हे वास्तव त्यांनी स्वीकारलं आहे. म्हणून त्यांना वाटतं की,

***श्वास सुरू राहतात जगावसं वाटतंच ना***

'स्वप्न' या कवितेत त्या म्हणतात, काही गोष्टी स्वप्नात पूर्ण कराव्या लागतात, वास्तवात त्या घडत नाहीत. लोक काही म्हणोत; पण –

***वेडच म्हणतील शहाणी लोक***
***तरी स्वप्न पाहायला हवे..***
***आकाशीच्या चंद्रासाठी कधी***
***पाण्यातही उतरायला हवे..***

म्हणून तर चंद्राला आकाशात बघण्यापेक्षा पाण्यातच त्याचे प्रतिबिंब बघावे असे त्या म्हणतात. स्वप्नातही कधी कधी समाधानाची प्राप्ती करून घ्यावी लागते, अशी त्यांची भोळीभाबडी समजूत आहे.

***आयुष्याची वाट चालताना तो प्रवास कधी तरी संपणारच आहे***
***कधीतरी संपणार असतोच प्रत्येक प्रवास***

असे 'मार्गस्थ'कवितेत त्या मत व्यक्त करतात, पण आयुष्य जसं असेल तसं स्वीकारायलाच पाहिजे. याचं त्यांना भान आहे. आयुष्य कसंही असलं तरी ते स्वीकारावंच लागतं, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. अन् त्या आयुष्यात असलेल्या सुख दुःखासकट मात्र ते स्वीकारणे भागच असतं, हे वास्तव त्यांनी स्वीकारले आहे.

त्यांच्या शोधकार्यात त्या भगवंताचाही शोध घेतात, त्या म्हणतात, तो नसता तर जगण्याचा अर्थच कळला नसता; पण विपश्यनेत येताच त्या शांत होऊन जातात. तेथे मात्र त्याच त्या होत्या, तेथे आणखी कोणी नव्हते. शरीराची सर्व कर्मेंद्रिये मात्र आपापल्या ठिकाणी होती; पण त्यांच्या कर्माबाबतची भीती मात्र आता राहिली नाही. हे तिसरे जग त्यांना भगवान बुद्धाच्या विपश्यनेत गवसले, असे म्हणायला हरकत नाही. विचारांची प्रगल्भता डोकावते, त्यांच्यातल्या प्रतिभेमुळे त्यांना देवाची ओळख झाली, असे म्हणायला हरकत नाही. 'गुणगुण निर्गुण' या कवितेत त्या म्हणतात,

***अवधान गळाले***
***सूर मिळाला***
***माझिया गळ्याला***
***देव कळाला.***

त्या अनात्मवादी असल्या तरी त्या नास्तिक मात्र नाहीत. ध्यानात ब्रह्मांडातून अनेक संकेत मिळत असतात, मधुर सूर, मंगल ध्वनी कानी येतात, त्यावेळी त्यातून ब्रह्मांडातील या वैश्विक ऊर्जेने शक्ती मिळत असते, त्यामुळे अचेतन मन शक्तिशाली बनते, मग आत्मचिंतन होते, याचा अनुभव कवयित्रीला आला आहे असे दिसून येते. त्यांच्या संवेदनशील मनातून सर्जनशीलतेमुळे नवनिर्मितीची शक्ती उफाळून आली अन् कविता जन्माला आली अन् त्यात प्रगल्भता ठासून भरलेली जाणवली. म्हणूनच त्या कविता आशय, अर्थासह हृदयाला जाऊन भिडतात आणि मग हे हृदयीचे ते हृदयी जाऊन हळुवारपणे स्पर्श करते. माऊलीच्या भाषेत म्हणायचे तर --

***कां भूमीचे मार्दव । सांध कोंभाची लवलव ।***

असे म्हणणेच उचित ठरेल. त्यांच्याकडे अध्यात्म आहे; पण त्या कर्मकांडात अडकत नाहीत आणि वेळ व पैसा व्यर्थ दवडत नाहीत, हे लीना संखे यांच्या काव्यसंग्रहाच्या 'अनात्म' या शीर्षकावरून लक्षात येते.

'अनात्म' या काव्यसंग्रहात त्यांनी चार टप्पे केलेले आहेत. त्यातील चौथ्या टप्प्याचा शोध घ्यावासा मला वाटला. जो त्यांनी जगलेल्या आयुष्यातील प्रगल्भ मनोवृत्ती, त्यांची आध्यात्मिक बैठक व आयुष्यातील वेगवेगळ्या टप्प्यांवर त्यांना जाणवलेले जीवनाचे रहस्य उलगडत असल्याचे मला जाणवले. त्यांच्या या पुढील साहित्यातील वाटचालीस मनापासून शुभेच्छा.


**(एम.ए. (मराठी) बी.एड. पीएच.डी., पत्रकारिता पदवी,**
**ज्योतिष प्रावीण्य, ज्योतिष प्राज्ञ, पुणे.)**
**निवृत्त महसूल अधिकारी**




## मानसिक स्वास्थ्य

# मन वढाय वढाय



**डॉ. राजेंद्र कुऱ्हाडे**

शरीराच्या आरोग्यावर झालेले चांगले वाईट प्रभाव दिसून येतात; परंतु मनावर झालेले परिणाम दिसून येत नाहीत किंवा खूप उशिरा दिसून येतात. शरीरातील आरोग्य समस्यांमुळे आप्तेष्ट मंडळींचीच नव्हे, तर इतरही लोकांची सहानुभूती मिळते. मनाचे आरोग्य बिघडले, तर सहानुभूती मिळेलच असे नाही. महान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी याचे समर्पक वर्णन केलेले आहे त्या म्हणतात –

*मन जह्यरी जह्यरी*<br>
*याचं न्यारं रे तंतर,*<br>
*आरे इचू, साप बरा*<br>
*त्याले उतारे मंतर ।*

मला नेहमीच रस्त्यावर फिरणारे शरीराने धडधाकट असणारे; पण खाण्यापिण्याचे, कपड्याचे भान नसलेले महिला व पुरुष दिसून येतात. त्याविषयी वाईट वाटण्याबरोबरच, काळजी आणि कुतूहल वाटायचे, जसे जसे यावर जाणीवपूर्वक चर्चा करायला लागलो तसे तसे मन हे खूपच महत्त्वाचे असून त्यावर अभ्यास करणे आवश्यक झाले.

सुरुवातीला मला वाटायचे की, मीच सर्व ज्ञानी आहे, मी खंबीर आहे. मी मानसिकदृष्ट्या समतोल साधतो आहे. मला स्वतःला माझ्या मनावर, मानसिक आरोग्यावर काम करायची गरज नाही; पण काही प्रसंगांनंतर मानसिक आरोग्यावर ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करू लागलो. ते जसे जसे मिळत गेले तसे तसे मलाच माझे मानसिक आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे हे कळू लागले. अगदी कॉलेजच्या काळात मी डॉ. राजेंद्र बर्वे यांचे लेख, पुस्तक वाचत असे, परंतु २००८ सालापासून प्रत्यक्षात लँडमार्क फोरम व इतर प्रशिक्षण पूर्ण करून, लाखो रुपये खर्चून माझी मानसिक मशागत चालू केली.

स्वतःच्या जगण्याची कल्पनाच बदलत गेली. मनाची चेतन व अचेतन मन यांची ताकद कळू लागली. संत तुकाराम महाराजांच्या खालील अभंगातील शब्दांचा महिमा माहीत होता; पण ते समजायला खूप मेहनत घ्यावी लागली.

***आम्हां घरीं धन शब्दाची रत्नें।***<br>
***शब्दाची शस्त्रे यत्न करूं ।।***<br>
***शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन ।***<br>
***शब्द वांटू धन जनलोकां ।।***<br>
***तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव।***<br>
***शब्द चि गौरव पूजा करूं ।।***

शब्दच आपले जग निर्माण करतात हे प्रत्यक्षात योग्य शब्दांचा वापर करून तपासून पाहिले. खूप मित्र, नातेवाईक, सहकारी यांना या पद्धतीची ओळख करून दिली. काही जण खूप प्रभावित झाले आहेत. याच प्रवासातून डॉ. नामदेव भोसलेंसारखे मित्र असंख्य लोकांचे दीपस्तंभ बनले आहेत. मनाने निर्मित केलेले प्रत्येक ध्येय शरीराने पूर्ण करण्यात यश मिळू लागले. मनावरील सर्व दडपण, भीती यांचे सावट बाजूला गेल्यामुळे मॅरेथॉन धावण्याचे स्वप्न पूर्ण करता आले. म्हणूनच मी नेहमी असे म्हणतो की, मानसिक आरोग्यावर काम करण्याचा मॅरेथॉन धावणे हा परिणाम आहे.

हे परिवर्तन माझ्या जवळच्या व्यक्तींना कळू लागले, तसे तेही या प्रवासात सहभागी झाले. यानंतर याच विषयावर बोलणारी, सुचवणारी मंडळी मिळत गेली. मी ज्यांच्याबरोबर धावणे सुरू केले त्या सर्वच धावपटूंनी लँडमार्कसारखे शिक्षण घेतले होते.

त्यातही काही जणांनी इनर इंजीनियरिंगचे कोर्सेस सुचवले; पण मला त्याला नोंदणी करून त्यावेळेस उपस्थित राहता आले नाही. विपश्यना साधना इगतपुरीला जाऊन केली. त्यानंतर मात्र माझ्या वर्तनात खूपच बदल करता आले. माझी सहचारिणी मनीषा नेहमी म्हणते माझ्यात खरा बदल विपश्यना केल्यानंतरच झाला आहे. असो, मध्यंतरी बराच काळ मनाविषयीचा प्रचार–प्रसाराचे काम कमी केले होते, परंतु मितालीला भावनेवर प्रभावी काम करणे अवघड जात आहे, असे जाणवले त्यामुळे पुन्हा लँडमार्कचे कार्यक्रम करता आले. मैथिली, मिताली हे कार्यक्रम करत असताना मनीषाला पुन्हा या शिक्षणाच्या मूल्यांची जाणीव झाली. ते चांगले समजू लागले व त्यात गोडीही वाढली. मैथिलीने दहावी, अकरावी, बारावीच्या वर्गात हे कार्यक्रम पूर्ण केले. त्याचा तिला खूप फायदा झाला.

यात मनीषाला जाणीव झाली की, याचे ज्ञान घेणे व इतरांना वाटणे यात खूप आनंद आहे. त्यातच लॉकडाऊनमधल्या काळात डॉ. नामदेव भोसले व मंडळींनी ऑनलाइन चर्चा आरंभल्या, त्यात मनीषा जोडली गेली व ते चालू असताना पुन्हा मानसिक आरोग्याकडे ओढला गेलो व त्यात पुन्हा प्रवास चालू झाला.

जीवन सुंदर आहे... मज्जाच मज्जा... व्यक्त व्हा! रिक्त व्हा! मुक्त व्हा! या टॅगलाईनला घेऊन चालू झालेले हे सेशन्स वेगवेगळ्या विषयांवर चालू झाले आहेत. ते सर्व सेशन यु–ट्यूबच्या चॅनेलवर उपलब्ध आहेत. यात मानसिक आरोग्य, आर्थिक आरोग्य, कौटुंबिक

*मन वढाय वढाय
उभ्या पीकांतलं ढोर,
किती हांकला हांकला
फिरी येतं पिकांवर.*

*मन मोकाट मोकाट
त्याले ठायीं ठायीं वाटा,
जशा वाऱ्यानं चालल्या
पान्यावर्हल्यारे लाटा.*

*मन लहरी लहरी
त्याले हातीं धरे कोन?
उंडारलं उंडारलं
जसं वारा वाहादन.*

*मन जह्यरी जह्यरी
याचं न्यारं रे तंतर,
आरे इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर !*

*मन पांखरू पाखरूं
त्याची काय सांगू मात?
आतां व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायांत.*

*मन चप्पय चप्पय
त्याले नहीं जरा धीर,
तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर.*

*मन एवढं एवढं
जसा खाकसचा दाना,
मन केवढं केवढं?
त्यांत आभाया मायेना.*

*देवा, कसं देलं मन
आसं नहीं दुनियांत !
आसा कसा रे यवगी
काय तुझी करामत !*

*देवा, आसं कसं मन?
आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तुले
आसं सपन पडलं !*

**– बहिणाबाई चौधरी**

स्वास्थ्य, पालकत्व, घोषणा, जबाबदारी इत्यादी विषयांवर चर्चा केल्या आहेत.

अशा कार्यक्रमांचे संरचित प्रशिक्षणात रूपांतर करण्याचे प्रयत्न चालू आहेत. यातूनच मनमुक्त फाऊंडेशन तयार झाले आहे. दर आठवड्याला यावर काम चालू आहे. यात मनमुक्त फाऊंडेशनच्या सदस्य मंडळींच्या मनाचे पैलू पडत आहेत. स्वतःच्या मनावर मेहनत घेऊन तावून सुलाखून तयार होत आहेत. खूप सारी प्रशिक्षणे आयोजित केली जात आहेत.

यातच यशदामध्ये काम करण्याची संधी मिळाली. वेगवेगळी प्रशिक्षणे घेता व देता आली. श्रीमती शीतल भोसले मॅडम यांनी सांगितल्यामुळे अमुकतमुकसारखे पॉडकास्ट पाहू लागलो. इमोशनल इंटेलिजन्सची पुस्तके वाचू लागलो त्यावर सेशन तयार करू लागलो. बुद्ध, ओशो, जे. कृष्णमूर्ती, डॉ. नाडकर्णी, डॉ. अल्बर्ट एलिस, डॉ. बर्वे इत्यादींचे साहित्य वाचन सुरू केले.

यातून जगण्यातला आनंद सापडू लागला, वाढू लागला. हा प्रवास खूपच मस्त आहे. दररोज स्वतःला तपासणे व कालच्यापेक्षा माझेच आजचे व्हर्जन चांगले करणे यात मजा येत आहे. मात्र या मनाच्या आरोग्याविषयी, भावनांविषयीचे ज्ञान मिळण्यास जरा उशीरच झाला आहे. नेमक्या भावना कोणत्या आहेत, त्या योग्य प्रकारे व्यक्त कशा कराव्यात. त्यांना प्रतिसाद द्यावा हे आता सहज जमतंय.

मनीषाने डॉ. राजेंद्र बर्वे व इतर तज्ज्ञ मंडळींचे अनेक प्रशिक्षण वर्ग पूर्ण केले आहेत. मानसिक आरोग्य, माइंडफुलनेस, स्ट्रेस मॅनेजमेंट, पॉझिटिव्ह सायकॉलॉजी, महिलांचे मानसशास्त्र इत्यादी विषयांवर डॉ. मिताली व मैथिली यांच्याशी होत असलेल्या चर्चेने माझी साधना चालू आहे. त्याच्याशी चर्चा करताना कस लागतो, त्यामुळे माझ्याही मनाची मशागत होत आहे.

यात सर्वात महत्त्वाचे ताणतणावाचे व्यवस्थापन प्रशिक्षण होय. तणाव हा आपल्या आयुष्यातील खूप महत्त्वाचा भाग आहे. त्याला समजून घेऊन त्याचा कुशलतेने वापर केल्यास किंवा योग्य प्रकारे व्यवस्थापित केल्यास आपले आयुष्य खूप सुंदर होऊ शकते. हे स्ट्रेस मॅनेजमेंटचे प्रशिक्षण मॅन्युअल जागतिक आरोग्य संघटनेने तयार केले आहे.

हे तयार करताना त्यांनी आतापर्यंतच्या सर्व परिणामकारक मानसशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग केलेला आहे. सर्व ज्ञान एकत्र करून परिणामकारक साधने आपल्याला ताणतणाव व्यवस्थापन करण्यासाठी उपलब्ध करून दिली आहेत.

यामध्ये तणाव म्हणजे काय? त्याचे व्यवस्थापन कसे करता येईल? सराव करण्यासाठी पद्धती दिल्या आहेत. आपलं जीवन परिपूर्ण, आनंदी जगता येईल, अशी सहज समजणारी व आचरणात आणता येतील अशी प्रात्यक्षिके दिली आहेत.

त्यामध्ये महत्त्वाची बाब ही कळली की, ताणतणाव प्रत्येक व्यक्तीला असतोच. तो कमी किंवा जास्त असतो, काही लोकांना मात्र आपले अवघड विचार किंवा भावना यांचा निचरा करणे, त्यास सामोरे जाणे सोपे वाटत नाही. तणाव कधीच काढून टाकता येत नाही, मात्र त्याचे व्यवस्थापन करता येते. तणाव हा वाईट नसतो, त्याचे व्यवस्थापन करणे हेच आव्हान होय.

ताणतणावाची व्याख्या अशी आहे –

'तणाव म्हणजे आंतरिक किंवा बाह्य, इच्छित किंवा अनइच्छित, नैसर्गिक किंवा मानवनिर्मित बदलाशी सामना करण्यात येणारे अपयश व त्यामुळे शरीराचा व मनाचा समतोल ढळणे होय.'

भविष्यातील किंवा भूतकाळातील ज्या घटनेमुळे आपल्या मनावर परिणाम होतो, वर्तमानातल्या भावनांना, कृतीला सामोरे जाणं अवघड वाटतं म्हणजेच तणाव येतो.

विचार, भावना व वर्तन यामध्ये ताळमेळ राहत नाही, तर या मॅन्युअलमध्ये तणाव व्यवस्थापनाचे टप्पे दिले आहेत. लक्ष केंद्रित करणे, स्वतःला कामात गुंतवणे, अनहूकिंग, ग्राऊंडींग, आपल्या मूल्यांवर काम करणे, दयाळूपणे वागणे, स्वतःसाठी एक जागा तयार करणे.

पंचइंद्रियांचा वापर करत आता आणि येथे आहोत याची जाणीव ठेवणे. यावर विस्तृत चर्चा केली आहे.

यावर शास्त्रशुद्ध माहिती देऊन, प्रात्यक्षिक देऊन लोकांना ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यास मदत करता येते.

यावर मी अनेक ठिकाणी संवाद साधतो. हे करत असताना माझ्या मनाच्या साधनेचा प्रवास चालूच राहतो. आपल्या कार्यालयात काही अघटित घडले की, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून विचारणा होते, दिवस व वेळ ठरते व नंतर करू असा निरोप त्यांच्याकडून येतो. मी मात्र सांगितले आहे, कोणत्याही दिवशी कोणत्याही वेळी मी उपलब्ध असेल. हा योग कधी येतोय ते पाहू या...

**(अक्षरखेंव मानसिक आरोग्य विशेषांक जानेवारी २०२५ मधून साभार )**

**(लेखक हे पुणे येथे राज्यकर सहआयुक्त पदावर कार्यरत आहेत.)**



# कोणार्क : एक शिल्पकाव्य

**भाग्यश्री भाईडकर**

बरेच वेळा पुढे ढकललेली ओडीशा ट्रीप यावेळी फेब्रुवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात झाली. जगप्रसिद्ध पर्यटन त्रिकोण भुवनेश्वर, पुरी व कोणार्क आणि त्यासोबत कटक. कोणार्क पाहायचे सुप्त आकर्षण बरीच वर्षे मनात होते. आपल्या चलनातील दहा रुपयांच्या नोटेवरील कोणार्कचे रथचक्र मी जेव्हाजेव्हा पाहायचे, तेव्हातेव्हा कोणार्कला भेट देण्याची इच्छा प्रबळ व्हायची. त्यामुळे ओडीशाला जायचे निश्चित झाले, तेव्हा ओडीशाची जास्तीत जास्त माहिती मिळवायचा मी प्रयत्न केला.

मी आणि माझी मुलगी अशा आम्ही दोघींनीच २ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईहून भुवनेश्वरला प्रयाण केले. सकाळी दहा वाजता आम्ही ओडीशाच्या भूमीवर उतरलो. पहिले दोन दिवस आम्ही भुवनेश्वर अनुभवले. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी आमचे कोणार्कचे नियोजन होते; पण त्या दिवशी होती रथसप्तमी. ओडीशात त्याला मघासप्तमी असेही संबोधले जाते. कोणार्कला त्यावेळी जत्रेचे स्वरूप असते. मघासप्तमी इथला सर्वात मोठा उत्सव. कृष्णाचा मुलगा सांब याला कृष्णाने शाप दिला व त्यामुळे त्याचे संपूर्ण शरीर कुष्ठरोगग्रस्त झाले. शापमुक्त होण्यासाठी त्याने चंद्रभागेच्या तीरावर (ओडीशामध्येही चंद्रभागा आहे.) बारा वर्षे सूर्याची तपस्या केली व सूर्याच्या कृपेने तो रथसप्तमीच्या म्हणजेच मघासप्तमीच्या दिवशी शापमुक्त झाला. त्याला चंद्रभागेत स्नान करताना दोन हातात कमलपुष्प असलेली सूर्यमूर्ती मिळाली व त्याने आपल्यावर उपकार केलेल्या सूर्याप्रति श्रद्धा म्हणून चंद्रभागा नदीच्या किनाऱ्यावर पहिले सूर्यमंदिर बांधले. सूर्याची पूजा कशी करावी, याची माहिती स्थानिक पुजाऱ्यांना नसल्याने त्याने थेट इराणमधून सूर्यपूजक मगा ब्राह्मण येथे पाचारण केले व स्थानिक भोजक कन्यांशी त्यांचे विवाह करून दिले व त्यानंतर ते ब्राह्मण येथे स्थायिक झाले. नंतर इथे सूर्याची पूजा सुरू झाली अशी कथा आहे.

सूर्याच्या कृपेने चंद्रभागेत स्नान केल्याने सांब रोगमुक्त झाला. याची आठवण म्हणून दर वर्षी रथसप्तमी म्हणजेच मघासप्तमीच्या दिवशी संपूर्ण जगभरातून लाखो श्रद्धाळू भाविक भल्या पहाटे चंद्रभागेत स्नान करतात व कोणार्क येथे दर्शनाला येतात. त्या दिवशी कोणार्क सूर्यमंदिर पाहण्यासाठी पर्यटकांना कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ही सर्व माहिती मी इंटरनेटवर वाचली होतीच; पण नंतर आमच्या वाहनचालक व हॉटेलकडूनही आम्हाला सल्ला मिळाला की, आम्ही ४ फेब्रुवारी २०२५ ऐवजी ५ फेब्रुवारी २०२५ ला कोणार्क पाहावे. गर्दीमध्ये कोणार्क अनुभवणे शक्यच नव्हते. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी आम्ही पुरीमध्ये मुक्काम केला. त्या दिवशी गर्दीमुळे जगन्नाथाचे दर्शन शक्य झाले नाही. मग दुसऱ्या दिवशी म्हणजेच ५ फेब्रुवारी २०२५ रोजी भल्या सकाळी पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घेतले व आम्ही दोघी निघालो कोणार्कला. विशेष म्हणजे या कोणार्क ट्रीपसाठीचा आमचा दोघींचा पेहराव होता पुरातन वास्तूला साजेशा असा काठपदराच्या साड्या.

कोणार्क शब्दाचा अर्थ कोनामधील अर्क. अर्क म्हणजे सूर्य. एका कोपऱ्यात म्हणजे कोनात असलेले सूर्यमंदिर म्हणजे कोणार्क. कोणार्कचे सूर्यमंदिर हे एक आश्चर्यच आहे. येथील शिल्पकला अद्वितीय आणि आपला पुरातन वारसा सांगणारी आहेच; पण या सूर्यमंदिराशी निगडित अनेक कथा व इतिहास उपलब्ध आहे. अगदी मंदिराच्या बांधकामाशी निगडित तसेच, इथल्या पडझडीशी निगडितही अनेक कथा इथे सांगितल्या जातात. त्यातल्या काही ऐतिहासिक आहेत की, ज्यांचे पुरावे व दाखले आजही मिळतात, तर काही कथा या दंतकथा या स्वरूपात आढळतात. या मंदिराची आज बरीचशी पडझड झालेली असली तरी पुरातत्त्व खात्याचे मंदिर जतनाचे प्रयत्न सुरू आहेत. मंदिर भव्य असून त्याचे देखणेपण आणि विशेषतः अशी आहे की, पडझड झालेल्या अवस्थेतील हे मंदिर तरीही आकर्षणाचे केंद्र ठरते. मंदिराचे वेगळेपण म्हणजे या मंदिराची अधिष्ठात्री देवता सूर्य. मंदिर बांधून सूर्याची उपासना ही फारच कमी प्रमाणात आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारापाशीच वाहनतळ व त्याला लागूनच एक छोटेसे उपाहार गृह व प्रसाधान गृह आहे. तेथून पुढे गेल्यावर तिकीट काऊंटर आहे. कोणार्क सूर्यमंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून दिसणारे सूर्यमंदिर पाहता एखादे खुले वस्तुसंग्रहालय आपण पाहत आहोत असा भास व्हावा. सूर्यमंदिराचा मुख्य गाभारा आता शाबूत नाही. त्याचे आता काही



अवशेष उरले आहेत. त्याच्या लगतचा सभामंडपाचा जगमोहन सुस्थितीत आहे. जगमोहनासमोरच काही अंतरावर अत्यंत आकर्षक असा भोगमंडप आहे. संपूर्ण सूर्यमंदिर हा सूर्यदेवाचा भव्य रथ आहे, अशी कल्पना करून मंदिराची निर्मिती केली आहे. रथाला भव्य चाके व घोडेसुद्धा आहेत. मंदिराच्या विस्तीर्ण प्रांगणाला उंच तट आहे. त्याला तीन दिशांना तीन महाद्वारे आहेत. यापैकी पूर्वेकडील महाद्वाराच्या दोन बाजूंना दोन आक्राळविक्राळ सिंह झेप घेताना दाखवले आहेत, तर उत्तरेकडील महाद्वाराजवळ दोन मोठ्या आकाराचे हत्ती उभे आहेत. दक्षिण महाद्वाराजवळ दोन मोठे अश्व उडी घेतानाच्या मुद्रेत आहेत. येथील शिल्पकाम भव्य असले तरीही कलाकुसर अत्यंत नाजूक व सुंदर आहे. मंदिरावरील मूर्ती कमनीय बांध्याच्या व प्रमाणबद्ध आहेत.

कोणार्कचे सूर्यमंदिराचे रथचक्र हे आपल्या सर्वांच्याच ओळखीचे आहे. हे सूर्यमंदिर म्हणजे सूर्यदेवतेचा भरधाव वेगाने धावणारा रथ. या रथाला उत्तर व दक्षिण बाजूला बारा-बारा मोठी चाके व पूर्वेला सात घोडे जोडलेले आहेत. बारा चाके ही बारा राशींचे प्रतिनिधित्व करतात तर एकूण चोवीस चाके ही वर्षात येणाऱ्या चोवीस पंधरवड्यांचे प्रतिनिधित्व करतात. या मंदिराचे प्रत्येक चाक हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रत्येक चाकावरील शिल्पकाम वेगवेगळे आहे. नऊ फूट व्यास असलेल्या या चक्रांना आठ आरे असून ते दिवसाच्या आठ प्रहरांचे प्रतीक आहेत. एक चक्र म्हणजे पूर्ण दिवस. तीन तासांचा एक प्रहर होतो. दोन मोठ्या आऱ्यांमध्ये अजून एक छोटा आरा कोरलेला आहे. तो अर्धा प्रहर म्हणजे दीड तास दाखवतो. मोठा आरा व छोटा आरा जोडणाऱ्या वर्तुळखंडावर तीस छोटे मणी कोरलेले आहेत. याचाच अर्थ तीन मिनिटांचा काळ एका मण्याने दाखवला आहे. या रथचक्रापाशी काठी धरली की, तिची सावली जेथे पडते त्यावरून दिवसाची वेळ समजते. तीस मण्यांमुळे अगदी मिनिटांपर्यंत अचूक वेळ समजण्याची सोय आहे. त्याचे प्रात्यक्षिक आम्ही आमच्या गाईडकडून पाहिले. आम्ही जेव्हा हे प्रात्यक्षिक केले तेव्हा दुपारी दोन वाजले होते व त्याची अचूक वेळ आम्हाला दिसून आली. रथचक्रांवर विविध शिल्पे आहेत. प्रत्येक रथचक्र हे जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा अर्थ सांगून जाते. या भव्य रथाला ओढण्यासाठी सात अश्व जोडलेले आहेत. सात अश्व म्हणजे सात दिवसांचे प्रतीक. या भव्य रथाचा सारथी हा सूर्य मंदिराच्या समोर बसून रथाचे सारथ्य करीत असे, तेव्हा निश्चित असा भास होत असेल की, सूर्य हा गतिमान रथ हाकत आहे. सूर्य आहे म्हणून जीवन आहे. निश्चितच हा अद्वितीय कला व संस्कृतीचा वारसा आहे.

कोणार्कच्या सूर्यमंदिराच्या उभारणीची दुसरी कथा अशी आहे की, गंगवंशीय राजा नरसिंहदेव याने त्याला युद्धात मिळालेले विजय हे त्याची उपास्यदेवता सूर्यदेवामुळे मिळाले आहेत, या श्रद्धेतून सूर्यदेवाचे अद्वितीय मंदिर उभारण्याचे ठरवले. मंदिर उभारणीत त्याने सढळ हाताने पैसा ओतला व एक अद्वितीय वास्तू इ.स. १२५० मध्ये निर्माण केली. त्यासाठी १२०० कारागीर सलग सोळा वर्षे खपत होते. राजाने आपले बारा वर्षांचे उत्पन्न म्हणजेच त्याकाळी सुमारे ३६ कोटी रुपये या मंदिर उभारणीसाठी खर्च केले. त्याला लाभलेल्या सर्व स्थपतींनी आपला जीव ओतून या कार्यात सहभाग घेतला. या मंदिराच्या उभारणीत भाग घेतलेल्या कलाकार व



स्थापतींची नोंद मादलापांजी या जगन्नाथपुरी येथील भूर्जपत्रांवर आहे. राजा स्वत: या बांधकामावर देखरेख करीत होता. सदाशिव सामंतराय महापात्रा या मुख्य स्थपतीने अन्य स्थपतींसह व शिल्पकारांसह हे मंदिर घडवले.

परंतु मादलापांजी या जगन्नाथपुरीच्या भूर्जपत्रावर असलेल्या नोंदीनुसार इ.स.च्या नवव्या शतकात पुरंदर केसरी या राजाने सूर्यासाठी मंदिर बांधले व पुढे नरसिंह देवाने या केसरी राजवटीचा पराभव केला व आधीच्या मंदिरासमोर एक नवीन मंदिर उभे केले. आधीच्या मंदिरातील सूर्याची मूर्ती काढून ती आपण बांधलेल्या नवीन मंदिरात प्रस्थापित केली. अशाच आशयाची नोंद अकबराच्या दरबारातील अबुल फझल याने आपल्या 'ऐने अकबरी' ग्रंथात केलेली आहे.

अजून एक दंतकथा प्रचलित आहे की, हे मंदिर पूर्ण झाल्यावर केवळ शिखराचे काम बाकी होते, परंतु मोजमापात काय चूक झाली हे समजले नाही व शिखर मंदिरावर बसू शकले नाही. अनेकांनी प्रयत्न केले, परंतु त्यात यश येत नव्हते. अपकीर्ती होण्याची वेळ आली. अशा परिस्थितीत मंदिराच्या मुख्य स्थापतीचा मुलगा धर्मपाल पुढे आला व एका रात्रीत त्याने मंदिरावर कळस चढवला; पण नंतर या धर्मपालाच्या मनात आले की, आपल्या या कृत्यामुळे इतकी वर्षे राबलेल्या कलाकारांची व आपल्या जन्मदात्या पित्याची नाचक्की होईल. त्यामुळे या मुलाने जिवावर उदार होऊन खाली वाहणाऱ्या चंद्रभागा नदीच्या पात्रात शिखरावरुन उडी मारून आत्महत्या केली. त्याला शिखरावरून नदीत ढकलून देण्यात आले असाही एक मतप्रवाह आहे.



मंदिर उभारणीच्या जशा कथा आहेत, तशाच मंदिर कसे ढासळले याच्याही कथा प्रसिद्ध आहेत. काला पहाड या मुस्लीम सरदाराने हे मंदिर उद्ध्वस्त केले, असे काही इतिहासकारांचे मत आहे, तर काही जणांचे असेही मत आहे की, इथे वीज पडल्यामुळे, भूकंपामुळे किंवा जमीन खचल्यामुळे हे मंदिर उद्ध्वस्त झाले. नदीच्या खोल पात्रात दगड टाकून ते पात्र बुजवले होते आणि त्या पायावर हे मंदिर उभे होते. तो पाया केव्हातरी खचला असावा व हे मंदिर उद्ध्वस्त झाले असावे असाही एक मतप्रवाह आहे. पूर्वीच्या काळी दर्यावर्दी खलाशी मंडळी या मंदिराला काळा पॅगोडा असे म्हणत असत. या मंदिराच्या शिखरावर अत्यंत प्रभावी असे लोहचुंबक होते. मंदिराच्या बांधकामातसुद्धा लोहचुंबकांचा वापर होता व सूर्यमूर्ती त्या लोहचुंबकांच्या प्रभावक्षेत्रामुळे अधांतरी असे. त्या चुंबकामुळे समुद्रातील जहाजे या मंदिराकडे ओढली जात असत. त्यामुळे काही खलाशांनी तो लोहचुंबक काढून टाकला व त्यामुळे हे मंदिर कोसळले अशीही एक दंतकथा प्रचलित आहे. इ.स. १६व्या शतकाच्या अखेरीला मुस्लीम आक्रमक व लुटारूंमुळे या मंदिराला बरेच नुकसान सोसावे लागले. लुटारूंनी मंदिराचा कळस व त्यावर असलेला पद्मध्वज पळवून नेला. या आक्रमकांनी मंदिरात प्रवेश केल्याने मंदिराचे पावित्र्य नष्ट झाले व म्हणून या मंदिरातून मुख्य मूर्ती हलवली गेली. मुख्य मूर्ती हलविली गेल्यानंतर मंदिरात येणारा लोकांचा ओघ आपोआप थांबला आणि मग हे मंदिर पूर्ण दुर्लक्षित झाले. कालांतराने ते ढासळले. जेव्हा हे मंदिर मोकळे करण्यासाठी दगडांच्या राशी बाजूला केल्या गेल्या, तेव्हा गाभाऱ्यात मूर्ती नव्हती. त्यामुळे हे मंदिर पूर्ण झाले नसावे, असाही तर्क काही विद्वानांनी काढला. त्याचबरोबर इथे सूर्याची पूजा ही एका तबकडीच्या स्वरूपात केली जायची म्हणून येथे सूर्याची मूर्ती मिळाली नाही असाही तर्क काही जण काढतात, परंतु इ.स. १२७८च्या आसपास होऊन गेलेल्या वाचस्पती मिश्रा नामक व्यक्तीने 'तीर्थचिंतामणी' या ग्रंथात कोणार्क येथील सूर्यपूजेची पद्धत दिली आहे. तसेच जगन्नाथपुरीच्या मादलापांजी या भूर्जपत्रावरून हे सूर्यमंदिर पूर्ण होऊन त्यात सूर्यमूर्तीची प्रतिष्ठापना झाली होती असे दिसते. ब्रिटीश राजवटीत इ.स. १८३७ मध्ये जेम्स फर्ग्युसन इथे आला होता व त्याने या मंदिराचे चित्र काढले आहे. त्यामध्ये मंदिराचा ८० ते १०० फूट उंचीचा मनोरा शाबूत असल्याचे दिसते. बाजूच्या खुर्दा राज्याच्या राजाने या मंदिरातील काही शिल्पे काढून स्वत:च्या राजवाड्याच्या बांधकामासाठी वापरल्याचे फर्ग्युसनच्या नोंदीमध्ये आहे.

कोणार्कचे सूर्यमंदिर दर्शन कसे करावे हासुद्धा एक अभ्यासाचा विषय आहे. हे मंदिर गाईडशिवाय समजू शकत नाही. इथे असंख्य शिल्पे आहेत. प्रत्येक शिल्पाची एक कथा आहे आणि अशी हजारो शिल्पे या मंदिरावर कोरलेली आहेत. ती पुस्तकातून वाचून समजत नाही तर प्रत्यक्ष त्या त्या शिल्पासमोर उभे राहून गाईडच्या



मुखातून ऐकणे हा एक समृद्ध अनुभव आहे. आमच्या सुदैवाने श्री. उमेश नायक हे पुराभिलेख खात्याचे गाईड आम्हाला लाभले. आमच्या हॉटेलसोबत हेरिटेज टूर्स या कंपनीचा टायअप असल्याने कोणार्कला त्यांनी आम्हाला वाहन उपलब्ध करून दिले होते. कोणार्कच्या सीमेत प्रवेश करतानाच आमच्या वाहनचालकाने विचारले की, गाईडची आवश्यकता आहे का आणि आम्ही हो म्हणताच त्यांनी श्री. नायक यांना दूरध्वनी करून बोलावून घेतले. श्री. नायक हे खूप वयोवृद्ध आहेत व त्यांनी आम्हाला खूप चांगल्या पद्धतीने हे मंदिर समजावून सांगितले. त्यांनी मंदिर जतनाच्या कार्यात पुराभिलेख खात्यासह सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांच्या कार्याची नोंद पुराभिलेख खात्याने मंदिराच्या प्रवेशद्वारावरसुद्धा घेतलेली आहे. प्रत्येक शिल्पाची एक एक कथा ते आम्हाला सलग तीन तासांहून अधिक वेळ समजावून सांगत होते. या पद्धतीने मंदिर पाहायचे तर सहा महिनेही अपुरे पडतील, तरी त्यांनी आम्हाला खूप छान माहिती दिली.

कोणार्कच्या सूर्यमंदिराबाबत विशेष सांगण्यासारखी बाब म्हणजे देवाच्या मंदिराबाहेर आपण पायातील चपला व बूट ठेवून नंतरच मंदिरात प्रवेश करतो. मात्र येथील सूर्याच्या मूर्तीच्या पायात बूट आहेत. हे बूट कुठून आले तर, इराणमधून जे शिल्पी येथे आले त्यांनी ही कला आपल्यासोबत आणली. मंदिरात ७० हजारांहून अधिक शिल्पे आहेत; पण एकही शिल्प दुसऱ्यासारखे नाही. मंदिराच्या चौथऱ्यावर १५००हून अधिक हत्ती कोरलेले आहेत; पण प्रत्येक हत्ती वेगळा आहे. कोणी दुसऱ्याची शेपूट पकडतोय, कोणी सोंड वर करतोय, कोणी पिल्लांना सांभाळतोय. घोडे, पशू, पक्षी, लता, वेली, विष्णुचे दशावतार, मानवी जीवनातले विविध प्रसंग या मंदिरावर कोरलेले आहेत. युद्धाला निघालेली सेना आहे. विजयी वीर आहेत. त्यांना परत आल्यावर स्वागत करणाऱ्या स्त्रिया आहेत. कामशिल्पे आहेत. उंच टाचांचे बूट घातलेली महिला आहे. हातात पर्स घेतलेली महिला आहे. श्रृंगार करणाऱ्या, वाद्य वाजवणाऱ्या, संगीत म्हणणाऱ्या, नृत्य करणाऱ्या महिलांची शिल्पे आहेत. यात्रेला जाणाऱ्या म्हातारीचे शिल्प व तिला निरोप देणाऱ्या कुटुंबाचे शिल्प आहे. विविध देवी-देवतांची शिल्पे आहेत. प्रात:काली झोपेतून उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत महिलेची दिनचर्या रथचक्रावर कोरलेली आहे. पौराणिक ग्रंथातील प्रसंग आहेत. जिराफाचे शिल्प आहे. जिराफ मुळात भारतीय प्राणी नाही, परंतु आफ्रिकेतून राजाला आलेल्या भेटीच्या अनुषंगाने त्याचे शिल्प कोरले आहे.

कोणार्कच्या सूर्यमंदिर संवर्धनाचे जे प्रयत्न झाले त्यात महाराष्ट्राचा व मराठ्यांचा सहभाग मोठा आहे. इ.स.१७व्या शतकात नागपूरच्या रघुजीराजे भोसले यांचे राज्य बंगालपर्यंत पसरलेले होते. त्या काळात मराठ्यांनी जगन्नाथ पुरी मंदिराचा भोगमंडप पूर्णपणे

बांधून दिला होता. रघुजीराजे भोसले यांचे प्रधान भास्करराव कोल्हटकर यांनी या कामात बरीच मदत केली. कोणार्कच्या सूर्यमंदिरासमोर असलेला अरुणस्तंभदेखील मराठ्यांनी मुघल आक्रमकांपासून बचाव व्हावा, म्हणून पुरीच्या जगन्नाथ मंदिरासमोर बसवला होता. रघुजीराजे भोसले यांच्या फौजांनी बंगालचा सुभेदार अलीवर्दी खानास जेरीस आणले होते. अनेक वेळा त्याचा पराभव केला होता. भास्करराव कोल्हटकरांना भास्कर पंडित असेही संबोधले जाई. त्यांचा ओडीशावर अंमल चालत होता. त्यांची दहशत बंगालमध्ये इतकी होती की, तिथल्या लोकगीतांमध्ये व बालगीतांमध्येही त्याचा उल्लेख आहे. एक कथा अशीही आहे की, एकदा भास्कर पंडिताचे काही सैनिक जंगलात गेले असता त्यांना जमिनीखाली जुन्या मंदिराचे अवशेष आढळले. त्यांनी परत येऊन भास्कर पंडिताला ही बातमी सांगितली. त्यांनी वाळूचे ढीग बाजूला करून हे मंदिर बाहेर काढले. कोणार्कच्या संवर्धनाचा हा पहिला प्रयत्न दिसतो. त्यानंतरही १७९३ ते १७९८ मध्ये राजा दिव्यसिंग देव यांनी दिवाणास मंदिर संवर्धन करण्याचे आदेश दिले व त्यासाठी २००० मुघल टंका चांदीची नाणी दिली. मात्र तीन महिने प्रयत्न करूनही त्याला त्यात यश आले नाही. त्यानंतर १८०६ मध्ये मरीन बोर्डाकडून हे मंदिर दुरुस्त करण्यासाठी विचारणा करण्यात आली. पुढे सन १८३८ मध्ये एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालकडे हे मंदिर दुरुस्त करण्यासाठी विचारणा करण्यात आली. इ.स. १९०० मध्ये लेफ्टनंट गव्हर्नर जॉन वुडबर्ग यांनी या मंदिराला भेट दिली व त्यानंतर मंदिर संवर्धनाच्या कामाला गती आली. त्यांनी अनेक उपाय योजले आणि मंदिर वाचवण्याचे अनेक प्रयत्न केले. मंदिराच्या आवारातील वाळू व दगड हटवले. ढासळू लागलेल्या जगमोहनाला भक्कम आधार देऊन त्याची पडझड थांबविण्यात आली. माती व दगड भरून तो पूर्ण भरून बंद करून टाकला व अगदी ढासळू लागलेली सूर्यमूर्ती दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात नेऊन ठेवली. सन १९०९ मध्ये मातीचे ढिगारे उपसताना आताचे महामाया मंदिर उजेडात आले. त्याचेही संवर्धन करण्यात आले. सन १९०९ पासून भारतीय पुरातत्त्व खात्याकडे या मंदिराच्या संवर्धनाची जबाबदारी आली आणि त्यांनी पूर्णपणे शास्त्रीय पद्धतीने या मंदिराची साफसफाई व डागडूजी केली. आजही मंदिर पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीत आहे. जेव्हा कोणार्कचे सूर्यमंदिर आपण पाहतो, तेव्हा साहजिकच मराठ्यांच्या या मंदिरासाठी दिलेल्या योगदानाची आठवण येते.



कोणार्क मंदिर परिसरातच छायादेवी व मायादेवी मंदिरे आहेत. तसेच पुरातत्त्व खात्यातर्फे मंदिर संवर्धनाची व इतिहासाबाबत एक छोटी दृक्श्राव्य फिल्म दाखवली जाते. मंदिर एकाच वेळी पूर्ण बघून होत नाही. शक्यतो गाईडसोबत मंदिर पाहिल्यावर पुन्हा स्वत: स्वतंत्रपणे पाहावे. कोणार्कमध्ये राहण्याच्या सोयी मर्यादित आहेत. पुरीहून हे मंदिर अंदाजे ३६ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे भुवनेश्वरपेक्षा पुरीमध्ये राहून हे पाहणे जास्त सोईस्कर आहे. मात्र पुरीमध्ये राहायचे असल्यास हॉटेलचे आगाऊ आरक्षण अत्यावश्यक आहे. इथे फिरताना भाषेचा अडसर जाणवत नाही. प्रामुख्याने हिंदी व ओडीया भाषा बोलल्या जातात. मराठी भाषा येथील लोकांना बऱ्यापैकी समजते. रोज सायंकाळी कोणार्कच्या सूर्यमंदिराच्या परिसरात एक लेझर शो असतो. ध्वनी व प्रकाशाच्या माध्यमातून कोणार्कचा इतिहास सांगितला जातो. आम्ही दोघीच असल्यामुळे या लेझर शोसाठी आम्ही थांबू शकलो नाही. कोणार्क फिरताना पाय दुखू लागले होते व डोक्यावर सूर्य तळपत होता. त्यामुळे आम्ही कोणार्कचा निरोप घेतला ते पुन्हा केव्हातरी इथे यायचे ठरवून. एक असामान्य व अद्वितीय शिल्पकला आम्ही अनुभवली होती. परतताना एक समाधान होते की, एक ऐतिहासिक व अमूल्य सांस्कृतिक ठेवा आम्ही प्रत्यक्ष पाहिला व अनुभवल्याचे.


**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

डॉ. नंदकुमार राऊत

# दौशाड

***किताबे क्या कहती है***
***तुम्हारे साथ रहना चाहती है।***

'दौशाड' हे माझा आत्मचरित्रपर संघर्षातून साहित्याची निर्मिती झालेलं पुस्तक २८ मार्च २०२४ रोजी राजहंस या पुण्यातील नामांकित प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. पुस्तक लिहून झालं होतं. प्रश्न होता पुस्तक प्रकाशन करण्याचा, त्याच्यासाठी प्रथमच मी राजहंस प्रकाशनाचे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर व डॉ. सदानंद बोरसे यांना भेटलो. पुस्तकाची वन लाईन स्टोरी सांगितली. ती दर्दभरी दास्तान ऐकून पुस्तक प्रकाशनाला प्रकाशक तयार झाले, मग दोन वर्षांच्या कालीवधीनंतर पुस्तक प्रकाशित झाले.




थोड्या दिवसातच मराठी साहित्यामध्ये मैलाचा दगड ठरलेलं असं हे पुस्तक गाजलं. पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर सर्वसामान्य चोखंदळ वाचक ते ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे, ज्येष्ठ लेखक अरुण शेवते यांना खूप भावलं. नेमाडेंनी तर पत्रच पाठवलं. अरुण शेवतेंनी प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा व्यक्त केली व ते मला भेटण्यासाठी मंत्रालयात आले. नुकतंच महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाने राज्यातील 'अ' वर्ग ग्रंथालयासाठी खरेदी करण्यासाठी प्रत्यक्ष त्यांच्या समितीपुढे ठेवलं. सदर समितीने त्यास मान्यता दिल्यानंतर शासनाने ४३ पुस्तकं खरेदी केली. मराठीतील ज्येष्ठ लेखक अरुण शेवतेंमुळे हिंदी चित्रपट गीतकार श्री. गुलजार यांना भेटण्याचा योग आला त्यांनी पुस्तकाचं भरभरून कौतुक केलं.

हे सर्व सुरू असताना नाशिक येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा सुरेश पवार यांनी सांगितले की, तुमच्या पुस्तकावर खूप लोकांनी लिहिलं आहे, तुम्ही काहीतरी लिहिले पाहिजे. मग मी पेन हातात घेतला.

## पुस्तकाची तयारी

मंत्रालयात नोकरी सुरू झाल्यानंतर माझा एक सहकारी श्री. परमेश्वर बाबर हा नेहमी मला म्हणायचा की, 'तू जे काही बोलतो, ते दशाकडून दिशेकडे आल्यासारखं वाटतं. त्यामुळे तुझा व तुझ्या कुटुंबाचा हा प्रवास शब्दबद्ध करणं आवश्यक आहे. तुझ्या कुटुंबाने केलेला संघर्ष व त्यानंतर मिळवलेले यश हा समाजातील प्रत्येक घटकासाठी एक दीपस्तंभ आहे.'



संघर्षातून साहित्याची निर्मिती होते. माण तालुक्यासारख्या दुष्काळी भागात दादा (वडील) हे खानदानी गरीब होते. पंजोबा गरीब, आजोबा गरीब, वडील गरीब. अठराविश्वे दारिद्र्य, दुष्काळी भाग. पिण्यासाठी सुद्धा टिपूसभर पाणी नाही. नेहमी पाचवीला पुजलेला पोटासाठीचा संघर्ष. दादा भूमीहिन मजूर, कधी शाळेचेही तोंड पाहिलेले नाही, अर्थात शिक्षणाचा गंध नाही. असा कथेचा भाग आहे. या भागामध्ये सलग तीन-तीन वर्ष पाऊस पडत नाही, कधी कधी पावसाची भवानीही होत नाही. पाचवी ते दहावीपर्यंत मराठी पुस्तकांचा अभ्यास करताना असला खूप संघर्ष वाचत आलो. आपलाही संघर्ष त्याप्रमाणे आहे. असं वाटलं आपणही आपल्यावर काहीतरी लिहावं, असं मनाच्या कुपीत कुठेतरी साठून राहिलं होतं. त्यावेळेला १९९३ साली कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे बी.एस.सी. (ॲग्रीकल्चर) झाल्यानंतर लिहिण्याचा विचार केला; पण प्रथम पोटापाण्याचं बघणं आवश्यक होतं. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून मंत्रालयात रूजू झालो. पुन:पुन्हा लिहावंस वाटायला लागलं, मग 'दौशाड'चा प्रवास सुरू झाला.

गोसावीवाडी, दुष्काळी भाग, बीन आई-वडिलांचे आईवडील, राहायला घर नाही. दोन वेळेची भ्रांत. एका खोपटात कुटुंब राहायचं, सारखं घर गळायचं, वडिलांना दोन लहान भाऊ होते. ते ही आई-वडिलांकडेच लहाणपणी राहायचे, तेही थोडे मोठे झाल्यानंतर त्यांनी मुंबई गाठली; पण मुंबईला गेल्यावर त्यांनी मागे पाहिले नाही. वडिलांना नेहमी वाटायचं. त्यांच्या दोन लहान भावांकडून काहीतरी आशा लागून राहिली होती. चार पैशाची मदत होईल; पण तसं काही घडलं नाही.

वडिलांच्या वेडसर बापाचं लवकरच निधन झालं. दोन शेळ्या, जमीन जुमला काहीच नाही. त्यातच वडिलांचं लहानपणी लग्न झालं होतं. वडील तापट आणि तिरसिंगराव. आई आपल्या लहानपणापासून कुटुंबाच्या काळजीने आणि कामाने बेजार झालेली असा तिचा संसार सुरू झालेला. त्यातच खादीला कार आणि धरणीला भार एक मुलगी झाली. तीही लहानपणापासून आजारी, तरीही ती लहानपणापासून काम करायची. अशी सुरुवातीला कथा सुरू होते; पण मुलांना जगवण्यासाठी आणि परिस्थितीवर मात करण्यासाठी आई आठवड्यातून चार दिवस उपवास धरायची. त्यातच मोठी मुलगी बारा वर्षांची झाली आणि त्या एक रात्री तापाने फणफणलेली मुलगी आजारी पडल्यामुळे, देह आईच्या मांडीवर टाकून गेली. आईला धक्का बसला, एवढा मोठा पोटचा गोळा गेल्याने तिला दु:ख सहन झालं नाही; पण तिचा अंत्यविधी झाल्यानंतर आई दुसऱ्या दिवसानंतर, दुसऱ्याच्या शेतात कामाला जायला लागली.

पहिली मुलगी वारल्यानंतर दुसऱ्या मुलीला आई कामात मदतीला घेत असे तिचही वय लहानच होतं; पण सरकारी कामावर लहान मुलांना कामावर घेत

नसत आणि ती मुलगी मोठी दिसावी म्हणून आई तिला साडी नेसवयाची. तिच्या हालअपेष्टा कुत्र खात नव्हतं. आता ती मुलगी वयाने मोठी झाली होती, आता तिचं लग्न करणं क्रमप्राप्त होतं. शेवटी कसंतरी करून बीन मायबापाचा असलेला व्यसनाधीन पोपट पिसे बरोबर लग्न झालं. आईच्या घरीही हालअपेष्टा होत्या व नवऱ्याच्या घरीही हालअपेष्टा होत्या अशी ती लंकेची पार्वती. ती दुसऱ्याच्या शेतात काम करत असे. सकाळ-संध्याकाळ नवऱ्याची मारझोड होती. साधारण वर्षानंतर तिलाही पोपट पिसेंनी माहेरी हाकलून दिले. तिचाही संसार मोडला होता. तो परत सोनबा एक दिवस तिला पोपट पिसेंच्या घरी घेऊन गेला. आणि तिचा अर्ध्यावर मोडलेला संसार मार्गी लावला.

चौथा मुलगा सोनबा, पाचवी ते सातवीपर्यंत शाळेच्या अगोदर सकाळी आठ ते दहापर्यंत दुसऱ्याच्या शेतात राबणारा, असाच कसातरी तो; पण मुंबईला जायचं भारी वेड होतं. त्यो असाच कसातरी कॉप्या करून दहावी पास झाला आणि आई-बापाची जबाबदारी खांद्यावर घेऊन त्याने मुंबई गाठली. सुरुवातीला मुंबईला आल्यानंतर त्याला काम भेटत नव्हतं. पहिल्यांदा ट्रकवर क्लीनर, नंतर ड्रायवर; पण गरीब परिस्थितीमधून घराला वर काढण्याची ऊर्मी त्याच्यामध्ये होती. झोपडपट्टीत राहून आम्हा दोन भावांना शिक्षणाला पैसा पुरवणारा तोच खरा कादंबरीचा नायक आहे.

तद्नंतरचा तानाजी खूप हुशार होता; पण पाटीही नाही व पेन्सीलही नाही. लक्ष्मी आईच्या मंदिरात शाळा शिकत होता. पहिलीच्या वर्गात त्याची शिक्षणाची चुणूक बघून ओंबासे गुरुजींनी त्याला दुसरीऐवजी तिसरीत टाकले आणि देवकीच्या पोटी श्रीकृष्ण जन्माला आला. तोही मोठ्या भावाबरोबर उन्हाळ्याच्या सुट्टीत व दिवाळीच्या सुट्टीत दुसऱ्याच्या शेतात काम करणारा आणि वर्षभराच्या शाळेच्या खर्चाची सोय करणारा. हा आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रथम एम.बी.बी.एस. डॉक्टर झाला, नंतर एम.एस. (जनरल सर्जन) झाला. आता तो ग्रामीण भागामध्ये कमी पैशामध्ये रुग्णांचे ऑपरेशन्स करणारा साताऱ्यातला नामांकित सर्जन आहे.

मीही लक्ष्मी आईच्या देवळात शिकलो. अतिशय सर्वसाधारण बुद्धी व अभ्यासाची आवड नसलेला, केवळ उनाडक्या करणारा कसंतरी तिसरीपर्यंत पोहोचलो आणि शेवटी इयत्ता तिसरीमध्ये नापास झालो. पुन्हा पाचवीला हायस्कुलला गेलो. पाचवी ते सातवीपर्यंत प्रत्येक वर्षी इंग्रजी व गणितात न चुकता नापास होत होतो. मी मोठ्या भावांबरोबर दुसऱ्याच्या शेतात सकाळी म्हणजे शाळेच्या अगोदर, तसेच दिवाळीच्या आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत काम करत होतो. सातवीच्या उन्हाळ्यातील सुट्टीत काम केलेल्या पैशाचे पुस्तक घेतले...आणि आठवीत गेलो...

माझ्याच भागात एक तरुण युवकाची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली होती आणि २२ सप्टेंबर १९८३ ला मी आठवीत असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्याला आम्हा विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी हायस्कूलने बोलवलं होतं. पूर्ण दीड तास तो काय बोलत होता हे कळत नव्हतं; पण असल्या कसल्यातरी पंधरावी झाल्यावर परीक्षा असतात आणि परीक्षा पास झाल्यावर जेवायला भरपूर मिळतं असं तो म्हणत होता. आमची मुख्य अडचण जेवण हीच होती. आम्हाला लाल दिव्याची गाडी किंवा मान-सन्मानाची काही अपेक्षा नव्हती. मीही मनाशी खूणगाठ बांधली आणि आपणही असल्या स्पर्धा परीक्षा द्यायच्या ठरवलं. दरम्यान दहावीला गेल्यावर कळले की, कृषी पदवीधर मुलं ही स्पर्धा परीक्षा पास होत असतात व मी बारावीनंतर कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे बी.एस्सी. (ॲग्रीकल्चर) ला प्रवेश घेतला आणि मी १९९३ साली बी.एस्सी. (ॲग्रीकल्चर) झालो.




**मोनिका राऊत**
(पोलीस उपायुक्त)

माझी पदवी झाल्यानंतर एमपीएससीचा अभ्यास करून मंत्रालयात माझी निवड झाली. लहानपणापासून आईचे आणि शेजारी आयाबायांचे हाल बघून मला नेहमी असं वाटायचं, कोणतीही स्त्री आर्थिक सक्षम पाहिजे. सध्याच्या काळामध्ये तिच्या हातामध्ये प्रत्येक महिन्याला कमीत कमी एक लाख रुपये तरी आले पाहिजे. स्त्री फार कष्टाळू आहे. पुरुषापेक्षा तीनशे पटीने काम करण्याची ताकत तिच्यामध्ये आहे, हे मी ओळखलं होतं. सुरुवातीला मीही काही लग्नासाठी मुली बघितल्या आणि सगळ्यात शेवटी बी.कॉम.च्या दुसऱ्या वर्षात असलेल्या गावाकडच्या मुलीशी लग्न केले. ते लग्न जमवतानाच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्याच्या अटीनुसार लग्न केले. तद्नंतर तिचे शेवटचे वर्ष पूर्ण करून, तिला स्पर्धा परीक्षांची तयारी करायला लावले. तद्नंतर दोन प्रयत्नांत असफल झाली. तद्नंतर तिसऱ्या प्रयत्नामध्ये एक मुलगी झाल्यानंतर तिची डीवायएसपीपदी निवड झाली.

सध्या ती नाशिक शहर येथे पोलीस उपायुक्त या पदावर कार्यरत आहे. सध्या आम्ही पती पत्नी ग्रामीण व शहरी भागातील मुला-मुलींना एमपीएससी, युपीएससी मोफत मार्गदर्शन करतो.

**(लेखक हे नियोजन विभागात अवर सचिव या पदावर कार्यरत आहे.)**



# भूक

अर्चना प्रकाश शंभरकर

'सुट्टीच्या दिवशी मंत्रालयात ड्युटी लागली की, हालच होतात खाण्याचे.' मंगेश मनातल्या मनात स्वत:वरच चरफडत होता. गेली कित्येक वर्षं कामाच्या दिवसात जेवायला म्हणून मंत्रालयातल्या कँटीनचं 'चौरस आहारचं' कुपन काढलेलं आहे. त्यामुळे रोजच्या दुपारच्या जेवणाची सोय होते इथेच. आता तर त्याला सवयच झालेली आहे. अनेक महिला आणि पुरुष अधिकारी, कर्मचारी जेवतात इथे. महिनाभराचं कुपन काढलं की, रोजचा पैसा खर्च करायची गरजच पडत नाही. 'चौरस आहार' असं नाव आता कोणी घेत नाही या कँटीनचं, चौरसचं सरळ इंग्रजीत स्क्वेअर करून टाकलं आहे. स्क्वेअरचा रोजचा मेन्यू ठरलेला. तसं चांगलं असतं इथे जेवण. उगाच अति तेल, तिखट, मसाले वापरत नाहीत जेवणात. त्यात कोशिंबीर आणि ताक पण देतात. मसालेभात असेल त्या दिवशी तर चांगलीच गर्दी होते. मिठ, लिंबू, भाजी, चपाती. सगळं वाढायचा क्रम ठरलेला. वाटी संपवून रिकामी केली तरच पुढला जिन्नस वाटीत पडतो. सगळंच कसं गरम आणि आयतं वाढून मिळणार. सगळे एका लयीत जेवतात. नव्हे जेवावंच लागतं, कारण आपल्यानंतर जेवायला आलेले दुसरे लोक कुपन हातात घेऊन आपला टेबल रिकामा व्हायची वाट बघत असतात. जेवणाची सुट्टी आणि स्क्वेअरची वेळ दोन्ही संपायच्या आत सगळ्या पंक्ती संपवायच्या असतात. घरून डबा ही सोय नसलेल्या चाकरमान्यांची भूक भागवायची असते.

गेली कित्येक वर्षं तो दुपारचं जेवण मंत्रालयातच घेत होता. कसारा लोकल पकडून मंत्रालयात पंचिंगला पोहोचायचं म्हणजे पहाटेच घर सोडावं लागायचं. त्यामुळे दुपारच्या जेवणाची सोय इथेच होत होती. मंगेशचं कामही चोख होतं. सगळं नियमानुसार. कसलीच म्हणून तक्रार नव्हती. दिलेलं काम नीटनेटकं आणि वेळेत पूर्ण करायचा. फक्त रात्री उशिरा थांबायला लागलं किंवा सुट्टीच्या दिवशी यायला लागलं तर सगळंच तंत्र बिघडत होतं. नेमकं आज सुट्टीच्या दिवशी मंत्रालयात यावं लागल्याने जेवण मिळणार नव्हतं. मंगेशने डोळे बंद केले आणि दीर्घ श्वास घेतला. आज आता इथेही त्याला चौरसच्या जेवणाची चव जिभेवर तरळली आणि तो वास नाकात शिरल्यासारखा वाटला.

लहानपणी घरात खाणारी तोंडं अधिक आणि कमावणारे हात कमी. त्यामुळे जेमतेम पोट भरण्यापुरतं जेवण मिळायचं. गव्हाची चपाती, गोड धोड हे फक्त सणासुदीला मिळायचं. कधी कधी तर गुळाचा खडा खाऊन पाणी पिऊन झोपी गेल्याचंही मंगेशला आठवतं. शेती तुटपुंजी आणि तीही अगदीच बेभरवशाची. आई-वडिलांनी शिक्षणाची कास धरायला दिली आणि मंगेशने घरातल्या सततच्या अडचणींवर मात करण्यासाठी आपल्यापुरता मार्ग शोधला. गाव सोडून मुंबईत आला. नातेवाईकांच्या साहाय्याने छोट्या मोठ्या नोकऱ्या करत शिक्षण घेतले. बघता बघता पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. एका छापखान्यात काम करत असताना ग्राफिक डिझायनिंग, पेज मेकिंगसारखी कौशल्ये आत्मसात केली. परीक्षा देत राहिला. आता मंत्रालयातल्या नोकरीसह खासगी डिझायनिंगची कामं करतो. मधल्या काळात पैसे जोडून हिंमत करून कसाऱ्याला छोटं घर घेतलं. घर, लग्न, संसार, मुलं सर्वच व्यवस्थित होतं. मंगेशच्या दृष्टीने त्याने जीवनात यश मिळवलं होतं. आता दोन वेळच्या खाण्याची भ्रांत त्याला नव्हती.

मुंबईत आल्यावर सुरुवातीच्या दिवसात एका होटेलमध्ये कपबश्या विसळण्याचं काम करताना पहिल्यांदा डोसा, सामोसा, ढोकळा अशा पदार्थांचा वास घेतला होता. मालकाकडे फक्त चहाची बोली असल्यानं या पदार्थांना तोंड लावण्यास त्याला मनाई होती. ग्राहकाने ताटात उष्टा सोडलेला एक सामोसा त्याने आपल्या कपड्यात लपवून ठेवला होता. नंतर लपून खात असताना नेमकं मालकानं बघितलं होतं. मार मार मारलं होतं. शिवाय नोकरी गेली होती ते वेगळंच. आज बाहेर काही खायला मिळतं का म्हणून मंत्रालयाच्या आसपास शोधत असताना समोर सामोसा विकणारा दिसला आणि मंगेशला पुन्हा एकदा लहानपणीची ही घटना आठवली. गरम सामोसा, गोड तिखट चटणी आणि त्यासोबत मस्त तळलेली हिरवी मिर्ची. सोबत हवा असेल तर पाव घ्यायचा म्हणजे पूर्णच लंच होतो.



परिस्थितीने म्हणा नाहीतर स्वभावगुण म्हणा, मंगेशच्या सवयी एकदम साध्या होत्या. साधं वरण-भाताचं जेवण त्याच्या प्रमुख गरजा म्हणाव्या लागतील. मुलांना आजकाल बाहेरचं खायला आवडतं. कधी पिझ्झा, बर्गर असेही पण पदार्थ मुलं आणतात खायला. मंगेश त्याला हातदेखील लावत नाही. सणासुदीला बायको जेव्हा वरणा-पुरणाचा स्वयंपाक करते, तेव्हा मात्र मंगेश आनंदी असतो. पदार्थांच्या रेलचेलीमुळे नाही, तर हे पदार्थ आता आपण अफोर्ड करू शकतो, याचं त्याला सुख मिळतं. घरी असेल तेव्हा बायकोला जेवण बनवायला मदत करतो. त्याला स्वत:ला अनेक प्रकारच्या चटण्या बनवता येतात. चटणी कुटायला त्याने खास खलबत्ता ठेवला आहे घरी. मिक्सरमध्ये वाटलेल्या चटणीत चव येत नाही, असं त्याला वाटतं. चटणी कुटताना दरवळणारा खमंग सुगंध त्याच्या खास आवडीचा. अनेक वर्षे त्याला सुदृढपणे जिवंत ठेवणारा 'चटणी भाकर' हा जगातला सगळ्यात पौष्टिक पदार्थ आहे, असं त्याचं मत आहे.

मंगेश विचार करत उभा होता. लहानपणी खाल्लेल्या किंवा न खाल्लेल्या त्या सामोस्याची त्याला पुन्हा एकदा आठवण आली. आज त्याने कित्येक वर्षांनंतर हातात सामोस्याची प्लेट घेतली होती. हाती घेताच सामोसा गरम असल्याची खात्री करून घेतली. एक दीर्घ श्वास घेत खमंग तळलेल्या सामोस्याचा दरवळ त्याने मनभर साठवून घेतला. मिरची पण खरपूस तळलेली होती. सोबत दिलेल्या हिरव्या-लाल चटणीमध्ये डुबवलेला सामोसा अगदी हळद कुंकू लावून नववधूचा शृंगार करून असल्यासारखा दिसत होता. डोळे मिटून त्याने सामोस्याचा एक तुकडा तोडला, जिभेवर एकाच वेळी अनेक वाद्यांचा लाईव्ह ऑर्केस्ट्रा सुरू झाल्यासारखं त्याला वाटलं. व्हायोलिनचे सूर, तबल्याची थाप, मोठ्या रंगमंचावर मांडलेल्या

विविध वाद्यांची आरास, कार्यक्रम सुरू असताना थियेटरमध्ये दरवळत असलेला सुगंध या सगळ्यांच्या एकत्रित अनुभवातून जमते ती खरी मैफील. तशीच तिखट, गोड, खुसखुशीत, खमंग, वाफाळलेल्या चवीची अनुभूती देणारी सामोस्याची मैफीलच होती.

मस्तपणे रंगलेल्या या मैफलीत अचानक व्यत्यय यावा तसं झालं. मंगेशला जोराने ठसका लागला. एवढ्या जोराने, की त्याला पुढचा घास ही खाववेना. डोळ्यात पाणी आलं आणि घशाखाली काही जात नव्हतं. जुन्या आठवणी काढायच्या नाहीत असं सतत स्वत:ला बजावत असताना भूतकाळात जाऊन येतंच मन. इतक्यात तर नेहमीच असं होतं. बायकोने माहेराहून मसाला बनवून आणला होता. हौशेनं चांगलं मटण भाकरी केली होती. मटणाचा काळा तवंग आलेला रस्सा पाहूनच तोंडाला पाणी सुटलं होतं. गावाकडच्या करीमच्या घरी बनायचं असं मटण. बकरी ईदला घरी वाटा पाठवायचा त्याचा अब्बू. बाकी घरी ऐपत नव्हती आतासारखी दर रविवारी मटण आणायची. हल्ली रात्रीची झोप लागत नाही शांतपणे, त्यामुळे सारखी ॲसिडीटी झाल्यासारखे वाटते. एक घासपण खाल्ला तरी पोटात आगीचा निखारा ढकलतो आहोत अशी जळजळ होते. त्या दिवशी मटणाच्या रश्शात भाकर चुरून घेतली; पण एकही घास जाऊ शकला नाही पोटात. आता हा साधा सामोसा; पण केवढं दमवलं यानं! ठसका एवढा लागला की थांबायचं नाव नाही. आता उलटी होईल असं वाटू लागल्याने मंगेश बाथरुममध्ये गेला. भडभडून उलटी झाली. ॲसिडीटीच असावी.. उलटीतून सगळं पित्त बाहेर पडलं असेल, असा विचार करून त्याला आता बरं वाटलं; पण उलटीतून लाल रक्त सांडलं होतं. त्यावर पाणी टाकायला त्याने नळ सुरू केला.



'मॅडम मी कधीच कोणाचं वाईट केलं नाही, कोणाला एका शब्दानेही दुखावलं नाही. स्वत:च्या मेहनतीनं इथवर पोहोचलो, खूप कठीण दिवस पाहिलेत मी, आता कुठे सुखाचे दिवस दिसायला लागले तर हे असं झालं. माझ्याच सोबत असं का झालं असेल मॅडम?' मंगेश बोलता बोलता अचानक मॅडमसमोर बसून रडायला लागला होता. डॉक्टरांनी 'इसोफेजियल कार्सिनोमा' असं शास्त्रीय नाव सांगितलं– म्हणजेच कॅन्सर असावा असा अंदाज वर्तवला होता. आज बाकीचे रिपोर्ट्स येणार होते. निदान झालं तर औषधं, शस्त्रक्रिया, केमोथेरपी असं सगळं करावं लागणार होतं. सुट्टी घेऊन हे सगळं करावं लागणार होतं, म्हणून अर्ज द्यायला तो मॅडमच्या केबिनमध्ये आला होता. मॅडमने समोर बसवून चौकशी करताच त्याला रडायला आलं होतं. निवृत्तीसाठी अजून अवकाश होता. मुलाबाळांच्या भविष्यासाठी जमा केलेला पैसा आजारपणासाठी वापरावा लागणार होता. वेळीच हेल्थ इन्श्युरन्स, लाईफ इन्श्युरन्स घेतलेलं होतं, तेव्हा पैसा ही चिंता तशी नव्हती. मात्र आता आपल्याकडे किती दिवस शिल्लक राहिले असतील या विचाराने त्याचं अवसान गळून गेलं होतं. जगलो वाचलोच तर यापुढे जीवन परावलंबी होणार होतं. नियतीने हातातोंडाशी आलेला घास हिसकावून नेला होता.

मंगेशला ॲडमिट करून घेतलं होतं. शस्त्रक्रियेपूर्वी किमान आठ तास उपाशी राहावं लागेल, अशा सूचना नर्सने समजावून सांगितल्या होत्या. लहाणपणी परिस्थितीने उपाशी राहावं लागलेल्या मंगेशला आज उपाशी राहण्याची केलेली सक्ती नकोशी झाली होती. एखाद्या धनाढ्य व्यक्तीच्या घरी लग्नाला गेल्यानंतर तिथे विविध चविष्ट पदार्थांचा बुफे सजलेला असावा आणि नेमका त्यादिवशी आपला संकष्टीचा उपवास असावा, एकाही पदार्थाची चवही न घेता पार्टीतून निघून यावं लागावं, तसं काहीसं मंगेशचं झालं होतं.

मंगेशला इंजेक्शन दिलं. त्याला गुंगी येऊ लागली होती. तशा अवस्थेत त्याच्या डोक्यात विचारांचं चक्र फिरू लागलं होतं. भडभुंज्यांनी लाह्या भाजायला घेतल्यावर एक एक लाही मोठी होऊन समोर येते तसं त्याच्या आयुष्यातल्या छोट्या मोठ्या आठवणींच्या लाह्या फुटून ताड ताड उडत डोळ्यासमोर पडत होत्या.

लहाणपणी बाजाराच्या दिवशी मिळणारी गरम जिलबी त्याच्या डोळ्यांसमोर तरळू लागली. बाबा आठवणीने आणायचे बाजाराच्या दिवशी गरम जिलबी. पाव किलो जिलबीमधला एकच तुकडा आपल्या वाट्याला यायचा. तेव्हा मन मारून राहावं लागायचं. नंतर डायबेटीस काठावर आला आहे, असं कळाल्यावर ऐपत असूनही जिलबी खाणं बंद केलं. खाऊन घ्यायला हवी होती.

कष्ट आणि अडचणींचा डोंगर चढताना केलेल्या उमेदवारीच्या काळात कधीतरी मोठ्या हॉटेलमध्ये जाऊन जेवावं असं वाटायचं, नाही जाता आलं. स्वत: कमवायला लागल्यावर कशाला पैसे वाया घालवायचे? असं वाटून नाही गेलो कधी, जाऊन यायला पाहिजे होतं.

स्टेशनवर मिळणारे भेळ, पाणी पुरी, चाट मसाला पापडी, रस्त्यावर मिळणारे चणे, कुरमुरे हे सगळं कधीच तोंडात टाकले नाहीत. रस्त्यावरचे विक्रेते स्वच्छता राखत नसतील, उगाच आजारपणाला निमंत्रण कशाला? असा विचार करून नाही खाल्ले कधी.. खायला पाहिजे होतं.

शिकत असताना नोकरी लागेपर्यंत वार लावून जेवण केलं, हक्काचं ताट आपल्या वाट्याचं एकाच घरी असावं असं वाटायचं. काढले ते दिवस. लग्नानंतर सुग्रण बायको कायम आग्रह करायची, 'मी पहाटे उठून डबा तयार करून देते दुपारच्या जेवणाचा, सोबत घेऊन जा'. मंत्रालयात चौरस आहार कॅन्टीनला मिळतंच ना चांगलं जेवण? बायकोला कशाला त्रास द्यायचा? असा विचार करून नाही आणला कधी सोबत डबा, आणायला पाहिजे होता. घरचं जेवण जेवायला पाहिजे होतं.

***भूक भागवायला आयुष्यभर केलेली धावपळ.. आता उपाशी राहायला सांगत होती. आयुष्याच्या पंक्तीतून भरल्या ताटावरून तो निघून जाणार होता. कदाचित मंगेशच्या भाळी 'भूकबळी' लिहिलं होतं.***

(सदर कथा ही अर्चना शंभरकर यांच्या आगामी मराठी कथासंग्रहातून घेण्यात आली आहे.)

**प्रभारी उपसंचालक, कोकण विभाग (माहिती)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



महाराष्ट्र शासन
सक्षम महिला
सुदृढ बालक
सुपोषित महाराष्ट्र
राज्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये होणार जयजयकार...
जय जिजाऊ, जय शिवराय !
प्रत्येक अंगणवाडीत राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमांचे पूजन होणार
अंगणवाडीतील बालकांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणीच्या गोष्टी सांगणार
अंगणवाडीतील बालकांना राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा करणार
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
अंगणवाडी
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
आदिती तटकरे
मंत्री, महिला व बाल विकास
मेघना साकोरे बोर्डीकर
राज्यमंत्री, महिला व बाल विकास
महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य

















# लिहिते व्हा...

## आपलं मंत्रालय



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई–मेलवर पाठवावेत.

## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
ई–मेल : **aaplemantralay@gmail.com**